चीनवर विश्वास ठेवू नका हे
पंतप्रधान नेहरू यांना त्यांच्या
तोंडावर सांगणारा एकमेव सेनापती
--थिमय्या --झुंड



# माणूस

१२ एप्रिल १९६९ । चाळीस पैसे

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

बेचाळीस रुपये

राजहंस प्रकाशन

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : सेहेचाळीसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. एप्रिल, १

'झुंड' या क्रमश: प्रसिद्ध होणाऱ्या लेखमालेतील ४ था हप्ता काही दृष्टींनी माहितीपूर्ण व विचारांना चालना देणारा असला तरी त्यातील 'आपली लष्करी तयारी नव्हती म्हणून चिन्यांबरोबर तडजोड करण्याचा' सल्ला मात्र कदापि न पटणारा वाटला. तडजोड केली असती तर त्यांच्याच अवास्तव अटी मान्य कराव्या लागल्या असत्या व पं. नेहरूंचा दुसरा 'चेंबर्लेन' झाला असता. चेंबर्लेनने तडजोड केली, तेव्हा ब्रिटनमध्ये हिटलरशी लढण्याची ताकद नव्हती. ब्रिटनने लढाई पुकारली तेव्हाही परिस्थिती फारशी बदलली नव्हती. तडजोडीत एकदा अटी मान्य केल्या असत्या तर त्या शिक्कामोर्तब होऊन वज्रलेप झाल्या असत्या. त्यापेक्षा तडजोड न करता, तयारी करून गेलेला मुलूख परत मिळवण्यासाठी योग्य संधीची वाट पाहणे केव्हाही इष्टच.

वा. र. मराठे, मुंबई.

मुखपृष्ठावरील जनरल थिमय्यांचे मूळ छायाचित्र
छायाचित्रकार डब्ल्यु. एन्. भट यांच्या सौजन्याने

किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

**मुंबई समाचार**

**सु. ल. सोमण**

# इतिहासाची पुनरावृत्ती

आयूबखानांनी सत्तात्याग करून लष्कराचे प्रमुख मे. ज. याह्याखान यांच्या हाती सर्व सत्ता सुपूर्द केली आणि लष्करी कायद्याच्या अंमलबजावणीस सुरुवात झाल्यानंतर अवघ्या दोन–तीन दिवसांतच, मे. ज. याह्याखान ह्यांनी पाकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षपदावर स्वतःची नियुक्ती घोषित केली. दहा वर्षांपूर्वी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष इस्कंदर मिर्झांची आयूबखानांनी ज्या पद्धतीने उचलबांगडी केली, जवळ जवळ अगदी त्याच पद्धतीचा अवलंब मे. ज. याह्याखान ह्यांनी केला आणि पाकिस्तानात इतिहासाची पुनरावृत्तीच घडली. त्या वेळच्या आणि आजच्या सत्तांतरांत फरक एवढाच की, मे. ज. इस्कंदर मिर्झांना फील्ड मार्शल आयूबखानांनी राष्ट्रध्यक्षपदावरून पदच्युत केले होते, तर ह्या वेळी, स्वतःच घडवलेला इतिहास मनावर पूर्णपणे बिंबला असल्यामुळे की काय, पण मे. ज. याह्याखान आपल्याला पदभ्रष्ट करीपर्यंत वाट पाहायचे आयूबखानांनी टाळले. फरक एवढाच असला तरी एक गोष्ट निश्चित की, शेवटपर्यंत प्रयत्न करूनही परिस्थिती सावरता येत नाही हे लक्षात आल्यानंतरच सैन्याच्या दडपणाला भीक घालणे प्रे. आयूबखानांना भाग पडले. किंवहुना परिस्थिती आटोक्याबाहेर जात आहे असे लक्षात आल्यानंतर सैन्याने हस्तक्षेप करण्याची तयारी दर्शविली, आणि तसे करताना आयूबखानांना सक्तीने सत्तात्याग करायला भाग पाडले, असेच म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. आता हेही उघड आहे की, हा लष्करी कायदा काही वर्षे व नंतर पुढे कित्येक वर्षे लष्करी हुकूमशाहीच पाकिस्तानच्या मानगुटी बसणार. एकप्रकारे, सत्तात्याग करत असतानादेखील, गेल्या वर्षभरात आयूबखानांना त्राहीभगवान करून सोडणाऱ्या विरोधकांवर त्यांनी चांगलाच सूड उगवला आहे. गेल्या दोन-तीन महिन्यांतल्या वाटाघाटींच्या सत्रांनी जी पाकिस्तानी जनता लोकशाहीची स्वप्ने पाहू लागली होती त्या जनतेला पाकिस्तानातल्या ह्या ताज्या घटनांनी जबरदस्त हादरा दिला आहे. तिच्या स्वप्नांचा, आशा-आकांक्षांचा साफ चुराडा केला आहे.

१९५८ साली पाकिस्तानात असाच गोंधळ माजलेला होता. त्या वेळी पाकिस्तानात बोलणी करण्यासाठी निघालेल्या एका पाश्चात्य शिष्टमंडळाला पं. नेहरूंनी मोठा मार्मिक प्रश्न केला होता–"पाक सरकारशी बोलणी करायची, म्हणजे निश्चित कुणाबरोबर आपण बोलणी करणार ?" पाकिस्तानातली त्या वेळची परिस्थिती काय होती, ह्याची ह्या प्रश्नावरून सहज कल्पना येईल. परिस्थिती आटोक्याबाहेर जाऊ लागली, तेव्हा प्रे. मिर्झांनी मार्शल लॉ पुकारला आणि त्या वेळचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल आयूबखान ह्यांच्या हाती सर्व सत्ता सोपविली. तीन महिन्यांत देशात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करून त्यांनी इस्कंदर मिर्झांना पदच्युत केले व ते स्वतः राष्ट्राध्यक्ष झाले. त्यानंतर गेली दहा वर्षे त्यांनी जवळजवळ अनियंत्रित सत्ता उपभोगली. प्रे. आयुबखानांच्या काळात पाकिस्तान-शासनाला जरी स्थैर्य मिळाले तरी, पाकिस्तानचे प्रश्न सोडवण्यात ते शासन यशस्वी झाले नाही. सुरुवातीच्या काळात अन्नधान्य, औद्योगिक उत्पादनात भर पडली तरी उत्तरार्धात पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती गोंधळाचीच राहिली. सर्व आर्थिक सत्ता केवळ वीस कुटुंबीयांतच केंद्रित झाल्यामुळे भयानक आर्थिक विषमतेचे चित्र दिवसेंदिवस अधिकाधिक गडदच होत गेले. कोसळणाऱ्या आर्थिक आघाडीवर जाड पडदा टाकण्यासाठी परकीयांची मदत, काश्मीरचा प्रश्न आणि जहाल भारतद्वेष ह्यांचे मिश्रण आयूबखानांनी वेळोवेळी वापरले. अमेरिका, चीन आणि अलीकडे रशिया ह्या अगदी भिन्न गोटांतल्या बड्यांबरोबर मैत्री राखण्याची व त्या सर्वांकडून लष्करी साहित्य मिळवण्याची अजब कसरतही त्यांनी यशस्वीरीत्या करून दाखवली. परंतु एवढे करूनही १९६५ च्या युद्धात पाकिस्तानला जबरदस्त मार खावा लागला आणि तिथेच आयूबखानांची पाकिस्तानवरची पकड ढिली झाली. त्यानंतर त्या वेळचे पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री झुल्फिकार अली भुत्तो ह्यांनी आयूबखानांची उचलबांगडी करायचा अयशस्वी प्रयत्न केला. त्या वेळी आयूबखानांच्या लांबलचक आजारांच्या व त्यांच्या स्थानबद्धतेच्या बातम्याही अनेक देशी-विदेशी वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केल्या होत्या. पण लष्कराचा पाठिंबा अद्यापही आयूबना होता व म्हणूनच त्यांनी भुत्तोंवरच डाव उलटवून त्यांनाच पदभ्रष्ट केले. असे झाले तरी आयूबखानांच्या लोकप्रियतेला ग्रहण लागायला सुरुवात झाली होती. त्यातच त्यांनी लष्करातल्या वजनदार होऊ पाहणाऱ्या अशगरखान आदी मोठमोठ्या व्यक्तींना आपल्या मार्गातून दूर करण्याचा सपाटा लावला. राजकीय पुढाऱ्यांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये असंतोष होताच. पूर्व पाकिस्तानची जनता पश्चिम पाकिस्तानच्या वर्चस्वाखालील सरकारशी कधीच एकरूप होऊ शकली नव्हती. बलुची, पख्तुनी, सिंधी आदी लोकांतही चीड निर्माण झालेली होती. कारण, त्यांची राज्ये नष्ट करून आयूबराजवटीने पंजाबचे वर्चस्व संपूर्ण पाकिस्तानवर लादलेले होते. अशा तऱ्हेने असंतोषाने खदखदणारा पाकिस्तान ठिणगी पडायचीच वाट

पाहत होता. बरोबर एक वर्षापूर्वी विद्यार्थ्यांच्या आंदोलनातून ती ठिणगी पडली आणि नंतर पाकिस्तान अक्षरशः पेटून निघाला. शासनयंत्रणा साफ कोलमडली. आयूब एवढे नरमले की, सत्तात्याग करून प्रौढ मतदान पद्धतीने निवडून आले-ल्यांच्या हाती सत्ता सुपूर्द करायची तयारी त्यांनी दाखवली. पूर्व-पश्चिम पाकिस्तानातल्या गव्हर्नरांच्या बदल्या केल्या. जनता, पुढारी लोकशाहीची चित्रे रंगवू लागले. परंतु तेवढ्यात आयूबखानांनी हा वेगळाच डाव टाकला आणि सारे चित्रच पालटले. आता निदान आणखी काही वर्षेतरी प्रेसिडेंट याह्याखान ह्यांची लष्करशाहीच पाक जनतेच्या माथी मारली गेली आहे.

पाकिस्तानातल्या ह्या सत्तांतराच्या काळात, लोकशाहीचा डिंडीम बजावणारे, अमेरिकन्स, ब्रिटिश सारेच स्वस्थ बसले आहेत. किंबहुना ब्रिटिश परंपरांचे पाठिराखे असलेल्या जनरल याह्याखान ह्यांनी सत्ताग्रहण केल्यामुळे त्यांना बरेच वाटत असावे; कारण आयूब राजवटीने पेकिंगशी केलेली दृढ मैत्री ह्या कुणालाच पसंत नव्हती. रशियनांनाही ह्याच कारणामुळे पाकिस्तानातला हा बदल स्वागतार्ह वाटत असावा. शिवाय प्रे. याह्याखान रशियनांना मित्र वाटतात. प्रे. याह्याखान ह्यांनाही स्वतःचा जम बसविण्यासाठी त्यांच्या मैत्रीची गरज भासणारच. अर्थातच ही तिन्हीं राष्ट्रे आशियातले स्वतःचे वर्चस्व राखण्यासाठी आणि चिनी भस्मासुराला दूर ठेवण्यासाठी आणि लोकप्रतिनिधींचे सरकार न येता आपल्या दबावाखालील लष्करी सरकारच पाकिस्तानात सत्तेवर ठेवण्यासाठी, प्रे. याह्याखान ह्यांना सर्वतोपरी मदत करणारच. परंतु ह्या वेळी चीनही स्वस्थ बसलेला नाही. त्याचे पाकिस्तानात दुहेरी प्रयोग चालू आहेत. काश्मीरच्या स्वयंनिर्णयाच्या पाकिस्तानी धोरणाला संपूर्ण पाठिंबा द्यायची घोषणा पेकिंगने ह्या सत्तांतरानंतरही केली आहे. रशियाविरुद्धच्या सीमा तंट्यात पाकिस्तानचा आपल्याला संपूर्ण पाठिंबा असल्याचा दावाही पेकिंगने अगदी अलीकडेच दिलेला आहे. अशा प्रकारे एकीकडे पाकिस्तानशी मैत्रीचा देखावा निर्माण करीत असतानाच, पूर्व पाकिस्तानातल्या साम्यवाद्यांना गोंजारण्याचेही प्रयत्न पेकिंग करीत आहेच. अलीकडच्या पूर्व पाकिस्तानातल्या अराजकाच्या वेळी स्थापण्यात आलेली 'जनता कोर्टे' ही चीनचीच करामत असल्याचे आता प्रसिद्ध झालेले आहे. पूर्व पाकिस्तानच्या स्वतंत्र सार्वभौम राज्याच्या निर्मितीच्या चळवळीलाही सक्रीय साहाय्य द्यायचे धोरण पेकिंगने अवलंबले आहे. असे झाले तर, भारताच्या दारातच, चीनला आपल्या पंज्यातल्या राज्याची उभारणी करणे शक्य होईल व तिथून भारतावर सातत्याने दडपण आणता येईल. ह्यातच प. बंगालमधले संयुक्त आघाडीचे साम्यवादी वर्चस्वाखाली सरकार, बंगालच्या एकीकरणाचे स्वप्न उराशी बाळगणारा एक गट, नागा-मिझो टेकड्यांच्या परिसरातले असंतुष्ट वगैरेंची पावलेही चीनकडेच पडत असल्याने हा सर्व टापूच पूर्व पाकिस्तानसह चिनी वर्चस्वाखाली आणायचे स्वप्न माओ-राजवट पाहत असल्यास आश्चर्य नाही.

ह्या एका मोठ्या प्रश्नचिन्हाबरोबरच, ह्या पाकिस्तानातल्या, सत्तांतरामुळे आणखी एक प्रश्न भारतापुढे उभा राहणार आहे. प्रे. याह्याखान यांनाही माजी प्रे. आयूबखान ह्यांच्याप्रमाणेच आपल्या सत्तेची सारी भिस्त सैन्यावर ठेवावी लागणार आहे. त्यांनाही पाकिस्तानचे प्रश्न सोडवणे जमेलसे दिसत नाही. त्यातच लष्करी मदत पाकिस्तानात रोजच्या रोजच्या रोज येतही राहणारच. देशातले प्रश्न वाढत राहिले व बाहेरून मदत येत राहिली की, काही तरी करून लोकांचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी, कुठेतरी वेधण्यासाठी, कुठेतरी मुलूखगिरी करणे, ज्या प्रश्नावर लोकांच्या भावना तीव्र आहेत त्या प्रश्नावरून तंटे उकरून काढणे हेच मार्ग लष्करी शासनापुढे उभे राहतात. ईजिप्तमध्ये प्रे. नासेरनी, इंडोनेशियात प्रे. सुकार्नोनी व पाकिस्तानात प्रे. आयूबखानांनी हेच केले व प्रे. याह्याखानांनाही कदाचित हेच करावे लागणार आहे. अर्थात प्रे. याह्याखान मुलूखगिरीसाठी एवढ्यात बाहेर पडणार नाहीत हे जरी खरे असले तरी, भारताने ह्या दृष्टीने तयारीत असावे हे उत्तम.

"भारत पाकिस्तानातले प्रश्न समाधानकाकरपणे सुटावेत असे वाटत असल्यास भारत-पाकिस्तान संघ-राज्याची निर्मिती व्हावी," असे श्री. मधू लिमये नुकतेच म्हणाले. कल्पना उत्तम पण याह्याखानांच्या गळी ती कोण उतरवणार ? एक मौलाना भाशानी व मजिबूर रहमान सोडले तर, पाकिस्तानातल्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांच्या सत्ताधाऱ्यांच्या पाश्चात्य राजकारणाचे प्रमुख सूत्र म्हणजे 'भारतद्वेष' हेच आहे. त्याच सूत्रावर प्रे. आयूब, लोकांच्या भावनांना चेतवत राहून सत्तास्थानी राहिले. तेव्हा ही सूचना आकर्षक असली तरी पाकिस्तान सरकारच्या गळी उतरवणे कठीणच. तसे प्रयत्न व्हायला हरकत नसावी, परंतु त्याच वेळी संभाव्य मुकाबल्यासाठीही भारताने तयारीत असावे. शेजारच्या राष्ट्रातल्या उलथापालथीमुळे भारतापुढे मात्र प्रश्नचिन्हे उभी राहणार आहेत हे निश्चित.

जनतेला कार्यक्षम सरकार लाभले नाही आणि जनतेतला असंतोष भडकतच राहिला तर काय परिणाम घडू शकतात त्याचे एक उत्तम उदाहरण म्हणूनही भारतातल्या राज्यकर्त्यांनी इतर विरोधकांशी पाकिस्तानातल्या उलथापालथीचा नीट खल करावा—विशेषतः भारतातल्या आजच्या परिस्थितीत तो अत्यंत आवश्यक आहे.

# काँग्रेस विसर्जित करा !

लोकसभेत २६ तारखेला (मार्च) सरकारला धक्का बसला. आसाम-पुनर्रचनेबाबतचे घटना दुरुस्ती विधेयक मताला टाकले गेले असता, आवश्यकतेपेक्षा चौदा मते कमी पडल्यामुळे फेटाळले गेले आणि गृहमंत्री श्री. चव्हाण ह्यांना हे विधेयक मागे घ्यावे लागले. घटना दुरुस्तीसाठी एकूण लोकसभा सदस्यसंख्येचे दोन तृतीयांश

मताधिक्य हवे असते. एकट्या सत्ताधारी पक्षाजवळ एवढे बहुमत नाही. तेव्हा त्यांनी खास प्रयत्न करून जनसंघ वगळता इतर सर्व राजकीय पक्षांचे सहकार्य मिळवले. परंतु एवढे प्रयत्न करूनही हे विधेयक संसदेत पसार होऊ शकले नाही. कारण खुद्द सत्ताधारी पक्षाचेच कित्येक सदस्य आणि कित्येक मंत्रीसुद्धा मतदानाच्या वेळी गैरहजर होते. ह्यातले काही खऱ्याखुऱ्या कारणामुळे तर काही बेफिकिरीमुळे गैरहजर होते; तर काही मात्र ह्या विधेयकालाच विरोध असल्यामुळे मतदानाला उपस्थित नव्हते, हेही तितकेच सत्य आहे. काँग्रेसमधला अंतर्गत विरोध जगजाहीर आहे व ह्या विधेयकालाही ज्येष्ठ-कनिष्ठ काँग्रेस सदस्यांचा विरोध होता व आहे. अर्थात ह्या एकाच प्रश्नावर काँग्रेसमध्ये अंतर्गत दुफळी आहे असेही नाही, तर अनेक किंबहुना प्रत्येक प्रश्नावरच काँग्रेसमध्ये दुफळी आहे. पाटील-मेनन, कामराजयोजना, इंदिराजी-मोरारजी, मूलभूत हक्क विधेयक वगैरे अनेक प्रकरणी हे वाद चव्हाट्या-वर आले आहेत. अगदी अलीकडची उदाहरणे म्हणजे चंद्रशेखर प्रकरण, राजा कामाख्यनारायण प्रकरण आणि मध्यप्रदेशात चालू असलेले "आयाराम-गयाराम" राजकारण. काँग्रेसमध्ये डावे-उजवे साम्यवादी आहेत, समाजवादी आहेत, राष्ट्रवादी आहेत तर अगदी भांडवलशाहीचे हस्तकही आहेत. आणि गंमत अशी आहे की, ही भिन्न मतप्रणालींची माणसे केवळ सत्तेच्या अभिलाषेने काँग्रेसमध्ये तग धरून आहेत. काँग्रेसमध्ये राहून आपली सत्ताकांक्षा सफल होत नाहीसे दिसल्यास 'जनता काँग्रेस', 'भाक्रांद' वगैरे नावे घेऊन काँग्रेसपासून तात्पुरता घटस्फोट घेऊन 'संविद'च्या वाहत्या गंगेतही हात धुऊन घेण्यास ह्यांना काही वाटत नाही. त्यामुळे काँग्रेसच्या विविध अधिवेशनांतून पसार झालेले ठरावही धड अंमलात आणले जात नाहीत की ह्या विविध मतप्रणालींच्या व्यक्तींच्या स्वविचारांनाही आचरणात आणले जात नाही. राबवला जातो तो केवळ भ्रष्टाचारच.

काँग्रेस ही भिन्न भिन्न विचारप्रणालींच्या लोकांची, स्वातंत्र्यसंपादनार्थ बांधलेली एक आघाडी होती. स्वातंत्र्यसंपादनाव्यतिरिक्त विशिष्ट अशी तात्त्विक बैठक तिला खास अशी कधी नव्हतीच. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेचच म. गांधींनी सांगि-तले की, काँग्रेस विसर्जित करा ! पण पं. नेहरू आदींनी ते ऐकले नाही. काँग्रेस राबवली. भिन्न विचारसरणींचे लोक सत्तेसाठी काँग्रेसला चिकटून राहिले अंतर्विरोध प्रखर असतानाही. पं. नेहरूंच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे हा विरोध कधी उफाळून वर आला नाही. त्यातही डॉ. लोहिया, राजाजी आदींनी विरोध केला. नवीन पक्ष काढले. काही कम्युनिस्टांना मिळाले. पण नेहरू असेतो विरोधात गेलेली जवळ जवळ प्रत्येक व्यक्ती कोलमडलीच. नेहरूंच्या हयातीत, निदान त्यांची धोरणे तरी काँग्रेसची म्हणून राबवली जात होती; त्यांना विरोध करण्याची हिंमतच कुणात नव्हती. पण नेहरूंनंतर हेही घडेनासे झाले आणि केवळ गांधी-नेहरूंच्या पुण्याईवर व त्यांच्या नावांचा आधार घेऊन काँग्रेसतर्फे निवडणूक लढवायची आणि सत्ता-

स्थानासाठी धडपडत राहायचे एवढेच कार्य काँग्रेस पुढारी महत्त्वाचे मानू लागले. आज केंद्रस्थानी व इतर जिथे जिथे काँग्रेसची मंत्रिमंडळे आहेत तिथे सर्वत्र सरकार-प्रमुखांना इतर कामापेक्षा प्रत्येकाची मर्जी राखण्यासाठी व त्याबरोबर स्वतःची खुर्ची सांभाळण्यासाठीच अधिक वेळ खर्च करावा लागतो. आणि तरीही स्वार्थी पक्षांतरांना व त्यामुळे घडून येणाऱ्या गोंधळांना आळा घालण्यात काँग्रेसच्या नेतृत्वाला यश मिळवणे कठीण जात आहे.

मग अशा परिस्थितीत काँग्रेस राबवण्याचा अट्टाहास का? एकीकडे गांधी-नेहरूंची, इतर स्वातंत्र्ययोद्धयांची नावे घ्यायची व दुसरीकडे तत्त्वशून्य, निर्लज्ज, स्वार्थी राजकारण खेळायचे, हा असला राष्ट्रीय जीवनाशी अघोरी खेळ कशासाठी? अशा वेळी काँग्रेस विसर्जित करणेच देशाच्या दृष्टीने फायद्याचे आहे. कदाचित त्यामुळे काही काळ देशात संमिश्र सरकारे अस्तित्वात येतील. परंतु काँग्रेस शिल्लक राहिली तरी १९७२ नंतर संमिश्र सरकारे टाळता येणार नाहीत, हे निश्चित आहे. पण काँग्रेस जर विसर्जित केली गेली, तर सध्याच्या काँग्रेसच्या कडबोळयात राहणारी विभिन्न पंथीय माणसे आपापल्या पंथाशी जवळीक असणाऱ्या पक्षांच्या राहुटीत शिरतील व निदान त्या त्या पक्षांची तरी निकोप वाढ होईल. गांधी-नेहरूंची कुठलीही तत्त्वे आचरणात आणीत नसतानाही, त्यांच्या पुण्याईवर तग धरून राहणारा हा पक्ष विसर्जित झाला तर विरोधी पक्षांतले नैराश्यही नाहीसे होऊन, निकोप लोकशाहीच्या वाढीलाच मदत होऊ शकेल.

म. गांधींचा वारसा सांगणारे काँग्रेसजन, त्या महात्म्यांच्या कुठल्याही तत्त्वांना योग्य न्याय देऊ शकले नाहीत. देशाच्या हिताच्या दृष्टीने निदान आता तरी काँग्रेस विसर्जित करून, म. गांधींनी १९४७ सालीच व्यक्तविलेली इच्छा काँग्रेसजन गांधी-जन्म शताब्दीच्या वर्षी तरी पूर्ण करतील का?

---

# महाराष्ट्र सरकारची लॉटरी

---

एका रुपयात अडीच लाख रुपये मिळवून देणारी व त्याचबरोबर महाराष्ट्राला धनश्री मिळवून देणारी महाराष्ट्र सरकारची लॉटरी अस्तित्वात आली आहे. त्यावर बरीच उलटसुलट टीका होऊनही. ह्या लॉटरी तिकिटांची पहिली सोडत १२ एप्रिलला रंगभवनात मोठ्या थाटात होणार आहे. ह्या लॉटरीची तिकिटे मुंबईत बहुतेकांजवळ दिसतात. कुणी कुणी वीस-वीस तिकिटे घेतलेली आढळली; अर्थातच ह्या लॉटरीविषयीची चर्चाही सर्वत्र चालू असते. अशाच चर्चेत कानांवर पडलेला एक विचार ' माणूस 'च्या वाचकांसाठी, त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या विचारार्थ उद्धृत करावासा वाटतो.

[ पान ५६ वर

# अमृतनाट्यभारतीच्या तीन नाटिका

वसु भगत

आयुष्याचा हिशेब करायला बसलो तर हाती काय लागते ?

आयुष्यातील साऱ्या देण्याघेण्याच्या बेरजा वजाबाक्या करून पाहिल्या तर शेवटी काय उरते ?

सारे हर्ष-विशाद, साऱ्या आशा-आकांक्षा शेवटच्या क्षणी कोणते माप पदरात टाकतात ?

यश, कृतार्थता, स्वत्व, शील, आत्मसन्मान, आत्मगौरव या साऱ्या कल्पनांना मृत्यूच्या संदर्भात काय अर्थ आहे ?

सत्य काय आहे आणि असत्य काय आहे ?

जीवनातल्या कोणत्याही क्षणी...अगदी मृत्युतीर्थाच्या महायात्रेचा अखेरचा क्षण आला असतानाही...या प्रश्नांना नेमकी उत्तरे सापडत नाहीत.

निदान या क्षणापर्यंत तरी ती सापडलेली नाहीत.

आणि यापुढे तरी ती सापडतील की नाही कुणास ठाऊक !

हे सारे प्रश्न अनुत्तरित आहेत. चिरंतन आहेत चिरंजीव आहेत. मस्तकावरची दारुण, प्राणांतिक पीडा देणारी वेदना घऊन दिशादिशांतून, युगायुगांतून भटकणाऱ्याचिरंजीव अश्वत्थाम्यासारखेच !

सुख आणि दुःख, वनवास, अज्ञातवास आणि कीर्ती, दासीपण आणि सम्राज्ञीपण उपभोगणाऱ्या द्रौपदीने मृत्युतीर्थाच्या महायात्रेला निघायच्या क्षणी आपल्या

| | | |
|---|---|---|
| वि. द. घाटे | भारतेंदू हरिश्चंद्र | विद्याधर पुंडलीक |
| डॅडी | अंधेरनगरी | चक्र |

आयुष्याचा हिशेब मांडला तेव्हा तिच्या हाती काय लागले ? सारे जीवन, त्यातील प्रकाशासह आणि अंधारासह, सन्मानांसह आणि अपमानासह भोगणाऱ्या द्रौपदीने आयुष्याच्या शेवटच्या क्षणी या प्रश्नांची उत्तरे शोधली तेव्हा तिला काय मिळाले?

तिच्या मुठीत उरली एक अमाप अर्थशून्यता. निःसारता आणि एक विराट खन्त एक विराट वेदना...या निःसारतेची ! ...या निरर्थकतेची !

मृत्यूच्या संदर्भात ही वेदना तेवढी सत्य आहे. ही खंत तेवढी खरी आहे !

द्रौपदीला महायात्रेच्या अखेरच्या टप्प्यावर उमगलेली ही निरर्थकता, हातात उरलेल्या शून्याची विदारक जाणीव श्री. विद्याधर पुंडलीक यांनी " चक्र " या एकांकिकेत शब्दारलेली आहे. आणि त्याहून अधिक समर्थपणे साकार केली ती श्री. कमलाकर सोनटक्के व कुमारी मीना सुखठणकर या दोन कलावंतांनी. गेल्या अठ्ठावीस तारखेला मुंबई मराठी साहित्य संघाच्या " अमृतनाट्यभारती "ने श्री. विद्याधर पुंडलीक यांनी लिहिलेली " चक्र " ही एकांकिका सादर केली. त्या एकांकिकेचे दिग्दर्शन केले होते श्री. कमलाकर सोनटक्के यांनी आणि द्रौपदीची भूमिका केली होती कुमारी मीना सुखठणकर या गुणी अभिनेत्रीने.

" अमृतनाट्यभारती " हा साहित्य संघाच्या नाट्यशाखेचा नाट्यशिक्षणविभाग आहे. नवीन कलावंतांना रंगभूमीचे शास्त्रशुद्ध आणि सर्वांगीण शिक्षण देणे हा " अमृतनाट्यभारती "चा उद्देश आहे. प्रायोगिक नाटके करणे, रंगभूमीच्या सर्वांगीण उत्कर्षास उपयुक्त अशा गौण कलाशाखांचा अभ्यास करणे, प्रदर्शने भरविणे, नाट्यविषयक ग्रंथांचा, छायाचित्रांचा व इतर वस्तूंचा संग्रह करणे हे " अमृतनाट्यभारती "चे कार्य आहे. हा नाट्यशिक्षणविभाग साहित्य संघाचे संस्थापक कै. डॉ. अमृत नारायण भालेराव यांच्या स्मरणार्थ निर्माण करण्यात आला असून त्याच्या प्रत्यक्ष कार्यास सुरुवात करण्यात आली ती गेल्या वर्षापासून. नाट्यशिक्षणाच्या गतवर्षी चालू झालेल्या पहिल्या वर्गाचे पहिले सत्र आता संपले आहे. त्या

निमित्ताने " अमृतनाट्यभारती "च्या विद्यार्थ्यांनी साहित्य संघाच्या मालेराव नाट्यगृहात श्री. वि. द. घाटे यांच्या अध्यक्षतेखाली तीन एकांकिका सादर केल्या. " चक्र " ही त्यातली एक.

" अमृतनाट्यभारती "च्या संचलनाची सूत्रे श्री. कमलाकर सोनटक्के यांच्या हाती सोपविण्यात आली आहेत. श्री. कमलाकर सोनटक्के हे एक अत्यंत जाणते, कल्पक आणि गुणी कलावंत आहेत. दिल्लीच्या "नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा" या संस्थेत श्री. अल्कांझी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी रंगभूमीच्या अंगोपांगाचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला आहे. " नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा "च्या खुल्या नाट्यगृहात मी त्यांच्या काही भूमिका पाहिल्या होत्या. आणि तेव्हाच मी त्यांच्या प्रेमात पडलो होतो.

वेरूळ - अजिंठ्याच्या सावलीत वाढलेल्या या माणसाचे सर्जनाचे सामर्थ्य आणि तांत्रिक ज्ञानाचा आवाका फार मोठा आहे. कल्पनेची कलात्मक झेप आणि तिच्या तांत्रिक अंमलबजावणीची ताकद मोठी आहे. " चक्र " किंवा त्यासोबतच सादर केल्या गेलेल्या " डॅडी " (लेखक–श्री वि. द. घाटे) आणि " अंधेरनगरी " (लेखक–श्री. भारतेंदू हरिश्चंद्र) या तीनही एकांकिकांमधून त्यांच्या या सामर्थ्याचा पावलोपावली प्रत्यय येत राहतो. त्यांचा आवाका क्षणाक्षणाला जाणवत राहतो.

असे वाटत राहते की, आपण एखादी गोष्ट का करतो आहोत याची त्यांना जाणीव आहे. त्या गोष्टीमागील किंवा कृतीमागील अर्थ त्यांना नक्की ठाऊक आहे. त्या गोष्टीचा त्या कृतीचा आपल्या परीने एक निश्चित असा अर्थ त्यांनी लावलेला आहे. आणि त्यातून कोणता परिणाम साधला जाणार आहे याचा त्यांना अंदाज आहे.

आपण काय करतो आहोत आणि का करतो आहोत याची जाण असलेले दिग्दर्शक मराठी रंगभूमीवर तरी फार थोडे आहेत.

श्री. कमलाकर सोनटक्के यांना ही डोळस जाण आहे म्हणून तर त्यांनी दिग्दर्शित केलेल्या या तीन एकांकिकांमधील सेटिंग्ज, प्रकाश, पात्रे, त्यांच्या मोकळ्या हालचाली, रचना अभिव्यक्ती या साऱ्यांना एक विलक्षण एकसंधता येऊ शकली. म्हणून तर लेखकांच्या शब्दांमधले आणि शब्दांपल्याडचे अर्थविश्व प्रेक्षकांच्या हाती येऊ शकले.

श्री. सोनटक्के यांच्या कल्पकतेचा पहिला प्रत्यय येतो तो तीन एकांकिकांच्या निवडीत. या तीनही एकांकिकांची प्रकृती वेगळी आहे. त्यांच्या जाती वेगळ्या आहेत. मूडस् वेगळे आहेत. शब्दांच्या मागे उभ्या असलेल्या त्यांच्या अर्थविश्वाची झेप आणि वजन वेगळे आहे.

श्री वि. द. घाट्यांची " डॅडी " ही एका एकाकी माणसाची कथा कुठल्या तरी शब्दातीत दुःखाने हारपळून निघत असलेला एक माणूस. त्याचे नाव " डॅडी. " त्याला दुसरे नावच नाही. हॉटेलच्या वेटरपासून तो तिथे येणाऱ्या गिऱ्हाइकापर्यंत

सारेच त्यांना डॅडी म्हणतात. वृद्धत्वाने केसांवर रुपेरी रंग चढलेले डॅडी एका पातळी-वर विलक्षण हिरवे आहेत. जीवनात रस घेणारे आहेत. नव्या पिढीच्या जोष जल्लोष, अवखळपणा आणि चुकासुद्धा समजून घेणारे आहेत. तिच्या दंगामस्तीकडे फाजीलपणाकडे, तिच्या उद्धट पण, उत्कट स्वप्नशीलतेकडे कौतुकाने पाहणारे आहेत. साऱ्यांच्या आनंदाने ते आनंदित होतात. साऱ्यांच्या दुःखाने ते दुःखी होतात. असा हा जगन्मित्र त्याच क्षणी दुसऱ्याही एका पातळीवर जगत असतो. इथे तो विलक्षण एकटा असतो. एकाकी असतो. शब्दातीत व्यथेने झाकाळला असतो. असे हे डॅडी या दोन्ही पातळ्यांवर जगत राहतात. छातीत उठणारी प्राणांतिक कळ सांभाळत.

सरळसरळ वास्तवाच्या पातळीवर वावरणाऱ्या या एकांकिकेत डॅडींबद्दल शब्दात काहीच सांगितले जात नाही. आणि तरीही ती कथा असते त्यांचीच. भोवतालचे वातावरण, रेस्तोरॉंत येणारी इतर गिऱ्हाइके, त्यांच्या वेगवेगळ्या व छोट्याछोट्या कथा, त्यांचे स्वभाव, त्यांचे मुडस् या साऱ्यांतून हळूहळू नकळत एका उदग्र व्यथेने चिंब झालेल्या " डॅड़ी " या व्यक्तिमत्त्वाची मन हेलावून सोडणारी कथा आकार घेत राहते. आणि एकांकिका संपते तेव्हा उरतात फक्त डॅडी, त्यांच्या छातीतील जीवघेणी कळ आणि व्यथेने ओथंबणारी त्यांची कथा.

या एकांकिकेकडे असलेला श्री. सोनटक्के यांचा ॲप्रोच आणि त्यांनी दिलेली ट्रीटमेंट ही मूळ एकांकिकेइतकीच वास्तववादी आणि सूचक आहेत. तपशीलाच्या बाबतीत विलक्षण वस्तुनिष्ठा राहूनही कलात्मक आविष्काराच्या व विस्ताराच्या बाबतीत हे डॅडींच्या व्यक्तिमत्त्वातील व्यथेइतकेच सूचक राहिले आहेत. काळा-तील बदल दाखविताना बदलणारी प्रकाशयोजना डॅडीच्या व्यथेचा आणखी एकएक गहिरा रंग घेऊन येत राहते. या बदलणाऱ्या प्रकाशयोजनेत वेटरने दिवे पेटविणे हा वास्तव तपशील आणि प्रकाशाच्या मंद व छायेच्या गडद अशा छटांच्या मिश्रणातून त्या साऱ्या सेटला आणि तिथे उभ्या असलेल्या डॅडीच्या व्यक्तिमत्त्वाला एक गहिरी भावस्पर्शी डूब मिळणे हा कलात्मक आविष्कार आणि विस्तार. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी अशा एकजीव होऊन घडत राहतात की, त्यांचे पृथकपण कळतच नाही. या आणि अशाच आवश्यक आणि अनावश्यक तपशीलाच्या मांडणी-तून त्यांचा कलात्मक आविष्कार साधला जातो. सजीव होतो. प्रसंगांचे मूडस् मूर्त होतात आणि त्यांतील भावांचे व आशयांचे मोड पृष्ठभागावर येतात.

'अंधेरनगरी'ची जातकुळी याहून अगदीच वेगळी आहे. अंधेरनगरीतल्या चौपट राजाची आणि त्याच्या विक्षिप्त मूर्खपणाची गोष्ट श्री. भारतेंदू हरिश्चंद्र यांनी गमतीदार पद्धतीने सांगितली आहे. हा साराच प्रकार घटकाभर करमणुकीचा आहे या एकांकिकेची प्रकृती लक्षात घेऊन श्री. सोनटक्के यांनी ती व्यंगचित्राच्या पद्धतीने मांडली आहे. प्रत्येक कृतीला अतिशय अतिशयोक्त आणि हास्यास्पद

स्वरूप देऊन त्यांनी तिचा विस्तार केला आहे. ही अतिशयोक्ती व हास्यास्पदता अधिक स्पष्ट व्हावी म्हणून सेटस् किंवा बदलती प्रकाशयोजना वापरण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले आहे.

आणि तिसरी एकांकिका " चक्र. " जीवनाचा हिशेब मांडू पाहणारी. मृत्यूच्या संदर्भात जीवनाचा अर्थ शोधू पाहणारी. तत्त्वज्ञानाचा मुखवटा ल्यालेली आणि तरीही विलक्षण काव्यात्म असलेली. मृत्युतीर्थाच्या महायात्रेला निघालेल्या द्रौपदीने जीवनाचे सारे व्यावहारिक पाश तोडून टाकले. आणि ती आयुष्याचा हिशेब मांडायला बसली तेव्हा तिच्या हाती उरले भले थोरले शून्य. तसे पाहिले तर तिने सारे जीवन, त्यांतल्या प्रकाशासह आणि अंधःकारासह भोगले होते.कौरवांच्या सभेत तिच्या स्त्रीत्वाची झालेली अवधीरणा तिने जळत्या मनाने जोपासली. सूडाची ज्वाला सदैव प्रज्वलित ठेवली. त्या सूडाच्या पूर्तीसाठी प्रचंड संहारक युद्ध घडवून आणले. जेत्या पांडवांची पत्नी म्हणून हस्तिनापूरचे सम्राज्ञीपण उपभोगले. अशा अवस्थेत तिने खरे म्हणजे तृप्त असायला हवे होते. कृतार्थ असायला हवे होते. व्यावहारिक अर्थाने तिचे जीवन यशस्वी झाले होते पण, " चक्र "मधील द्रौपदी अशी तृप्त नाही. कृतार्थ नाही. कारण, तिला एका दारुण वस्तुसत्याची जाणीव झाली आहे. ती भोगत असलेले सम्राज्ञीपणा अनेक स्त्रियांच्या वैधव्यातून तिला मिळाले होते. तिच्या सूडाच्या आगीत सारे कौरवकुल जळून राख झाले. तिचे माहेर उद्ध्वस्त झाले. पंडू कुलातही एक परीक्षित वगळला तर उद्या काहीही शिल्लक राहणार नव्हते. तिची स्वतःची मुले कृमिकीटकांसारखी मृत्युमुखी पडली होती. माता होऊनही ती अखेर निपुत्रिकच राहिली होती. आपल्या मुलांच्या मरणाचा सूड म्हणून तिने अश्वत्थाम्याच्या मस्तकात जीवघेऊ वेदना निर्माण करून ठेवली. तरीही तिला काय मिळाले ! ...फक्त एक शून्य...एक निरर्थकतेची जाणीव आणि या जाणिवेची विराट व्यथा !


हा विषय श्री. विद्याधर पुंडलीक यांनी लिहिला त्याहून कितीतरी चांगल्या रीतीने आणि कितीतरी अधिक ताकदीने " अमृतनाट्यभारती "ने उभा केला. यात सिंहाचा वाटा दिग्दर्शक श्री. कमलाकर सोनटक्के आणि द्रौपदीची भूमिका करणारी कुमारी मीना सुखटणकर यांचा असला तरी भीमाची भूमिका करणारे श्री. अरविंद आर्यमाने, अश्वत्थामा झालेले श्री. श्याम खांडेकर आणि प्रकाशयोजना सांभाळणारे श्री. प्रकाश मळकर्णेकर यांचे श्रेयही फार मोठे आहे. सेटिंग्ज स्वतः श्री. सोनटक्के यांचेच होते. आणि " अमृतनाट्यभारती "च्या विद्यार्थ्यांनी त्यांना साह्य केले होते. तीन स्तंभ आणि मागे डाव्या कोपऱ्यात एक कमान एवढ्यावरच द्रौपदीच्या प्रासादाचे दृश्य उभे केले गेले होते. या एकांकिकेचे सर्वांत महत्त्वाचे आणि विलोभनीय असे वैशिष्ट्य म्हणजे मीना सुखटणकरने केलेली द्रौपदीची भूमिका. या एवढ्याशा पोरीने " चक्र "तील द्रौपदी विलक्षण ताकदीने उभी केली.

आपल्या सम्राज्ञीपणाची जाणीव असलेली आणि तरीही हाती आलेल्या शून्याचा अनुभवाने मुळातून उन्मळून गेलेली द्रौपदी, तिच्या साऱ्या वास्तव तपशीलासह आणि घनघोर अशा भावनात्मक वादळासह तिने साकार केली. " डॅडी "मधल्या सुशीलाबाईंच्या भूमिकेचे वजनही तिने अशाच विश्वासाने तोलून धरले होते.

या तीन एकांकिकांत, अभिनयाच्या दृष्टीने केवळ एकटी मीनाच नव्हे तर इतरही बरेचजण लक्षात राहिले. " डॅडी "तील नारायण घोसाळकर व शरद जयकर, " अंधेरनगरी "तील अजित केळकर, अरविंद आर्यमाने, ही मंडळी आपल्याबद्दल खूप अपेक्षा निर्माण करून गेली. आणखी एका गोड छोकरीचा उल्लेख करायला हवाच. " डॅडी "तली सूनबाई आणि " अंधेरनगरी "तील मछलीवाली. रोहिणी पैंगणकर नावाच्या अतिशय लोभस चेहऱ्याच्या चिटुकल्या पोरीने ही दोन्ही कामे इतक्या चुणचुणीतपणे केली की, तिच्यासाठी कुणीतरी एखादे नाटक लिहावे, असे मनापासून वाटले.

पण, या " तरतमा "पेक्षाही आणखी एक मोलाची गोष्ट मला जाणवली. हे सारे नाट्यक्षेत्रातले हौशी कलावंत नव्हेत तर, हौशी उमेदवार आहेत. त्यांच्यांतील " तरतमा "चा हिशेब महत्त्वाचा नाही. महत्त्वाचा आहे तो त्यांचा निष्कलंक उत्साह. त्यांची अमाप निष्ठा. त्यांची प्रचंड जिद्द. महत्त्वाचा आहे तो त्यांचा एकोपा. त्यांचे स्पिरिट. या कोवळ्या पोरांतील प्रचंड जिद्द, विलक्षण एकोपा आणि निष्ठापूर्ण सांघिकता तीनही एकांकिकांतून क्षणाक्षणाला जाणवत होती. प्रत्ययास येत होती. तुम्ही, आम्ही आणि त्यातही विशेषतः साहित्य संघातील जाणत्या अनुभवी लोकांनी हे जपायला पाहिजे. जपायलाच पाहिजे. कारण, हे जपणे साहित्य संघाच्या किंवा कुणा व्यक्तीच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने नव्हे तर; मराठी रंगभूमीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

○



# □ कोचीनचे राजे

कोचीनचे आता केरळ राज्य झाले आहे. कोचीन संस्थान होते तेव्हाची ही गोष्ट आहे. स्पेन आणि पोर्तुगालमधून १६ व्या शतकात काही गोरे ज्यू मलबारात आले. त्याच्या पूर्वी सोळा शतके किरमिजी रंगाचे काही ज्यू पॅलेस्टाईनमधून आलेले होते. जगात कुठे आसरा नाहीसा झाला की, लोकांनी आपल्या देशात पथारी टाकण्याची परंपरा इसवी सनाच्या पहिल्याच शतकात सुरू झाली. या किरमिजी ज्यू मंडळींच्या आगमनाला नुकतीच १९०० वर्षे पूर्ण झाली. याचा मोठा समारंभ केरळात साजरा झाला.

गोऱ्या ज्यूंनी आपल्याबरोबर काही काळे ज्यू आणले. आफ्रिकेतील गुलामांची ही प्रजा त्यांनी इथे आणली ती गोऱ्या ज्यूंकरता श्रमदान करण्यासाठी. या मंडळींशी गोरे ज्यू विवाहसंबंध ठेवीत नसत, परंतु त्यांची 'सोय' तर करायला हवी. म्हणून मग या काळ्या ज्यूंनी भारतातल्या स्त्रियांशी लग्ने केली. हिंदू थोडे कमी झाले खरे, परंतु ज्यू सुखी झाले.

कोचीनच्या राजाला मोठा आनंद झाला. आपल्या राज्यात काही गोरी मंडळी राहतात! त्यांच्या मुलाबाळांना राजेसाहेबांनी शिक्षणासाठी खास शिष्यवृत्त्या सुरू केल्या. गेली ४०० वर्षे ही गोरी ज्यू कुटुंबे भारताने पोसली. कोचीन राज्यात मग एक नवे शहर झाले. त्याचे नाव 'ज्यू–टाऊन.' या शहरात ज्यूंचे मोठे प्रार्थनामंदिर ४०० वर्षांपूर्वी उभे झाले. १२००० रुपये वार्षिक उत्पन्न देणारी जमीन या देवस्थानला कोचीनच्या राजाने लावून दिली! याला म्हणतात निधर्मी उदारता! गोरे ज्यू मोठे धार्मिक वृत्तीचे. वर्णभेद कसोशीने पाळणारे. गोऱ्यांच्या या मंदिरात काळ्या किरमिजी ज्यूंना प्रवेश नसतो. 'ज्यू–टाऊन'मध्येच दुसरे निराळे सिनेगॉग हे या कृष्णवर्णीयांचे स्वतंत्र बांधलेले आहे.

तूर्त 'ज्यू–टाऊन'मध्ये १२ गोरी ज्यू कुटुंबे राहतात. सर्व मिळून ८७ मंडळी आहेत. यांच्या नेत्याचे नाव आहे श्री. कोडेर. या कोडेर कुटुंबाचा जहाजबांधणीचा धंदा आहे. माणसे हुशार आहेत. लालसमुद्रातले औताल बंदर भूमध्य समुद्राला जोडण्याची योजना कोडेर कुटुंबातील एका तरुण इंजिनीअरने इस्रायली सरकारला सादर केली आहे. त्यावर जेरूसलेममध्ये विचार चालू आहे.

कोडेर यांचे घराणे फार श्रीमंत आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गरीब काळ्या ज्यूंची पांगापांग झाली. त्यांचे सिनेगॉग मोडकळीस आले. ती जागा विकत घेऊन तिथे काही मंडळींनी देऊळ बांधण्याचे ठरवले आहे, अशी कुणकुण कोडेर

कुटुंबाला लागताच, श्री. कोडेर यांनी ती जागा काळचा ज्यूंकडून रु. ८००० ला विकत घेतली व तिथे नवा बंगला स्वतःसाठी बांधला. याला म्हणतात धर्मप्रेम.

असे हे धर्मप्रेमी, हुशार, गोरी कातडी श्रेष्ठ मानणारे ८७ ज्यू सध्या फिकिरीत आहेत. ४०० वर्षे भारतात नांदले परंतु आता 'इस्रायल'ला जाण्यासाठी ते सर्व उत्सुक आहेत. आपला देश त्यांना बोलावीत आहे.

परंतु मोरारजी म्हणतात, जायचे तर जा, पण जाताना प्रत्येकाला फक्त रु. ७५ बरोबर नेता येतील. इतकी वर्षे या भूमीने तुम्हांला पोसले, तरी तुम्ही या देशाला आपली 'पितृभू' समजत नाही. मग खुशाल चालते व्हा. परंतु इथली संपत्ती इथेच राहील.

अर्थात गोरे ज्यू कष्टी झाले. काय करावे हे त्यांना सुचेना. इतक्यात त्यांना सल्ला मिळाला – 'इंदिरास्तवन' करा. तुमचे मनोगत सिद्धीस जाईल. मंडळी तयारीला लागली. 'ज्यू-टाऊन'मधल्या फक्त गोऱ्या लोकांसाठी असलेल्या सिनेगॉगचा ४०० वा वाढदिवस– चौथी शताब्दी– साजरी करण्यासाठी इंदिराजींना निमंत्रण केले. इंदिराजी या समारंभासाठी अगत्याने आल्या. नुकताच केरळात हा समारंभ झाला. जातिभेद मानणारे असले तरी कातडी गोरी आहे. मग पंतप्रधानांनी जायला नको? म्हणून इंदिराजी समारंभाला गेल्या. मोरारजींना बोंबलत ठेवून सर्व संपत्तिनिशी देशाबाहेर निसटण्याचे या गोऱ्या ज्यूंना जमणार असे दिसते. मित्रांनो, तुम्ही जाणार याचे काहींना दुःख होते आहे, खुशाल आपल्या 'प्रिय-इस्रायल'मध्ये सर्व संपत्तिनिशी जा. धर्मशाळा सोडताना आपली सर्व संपत्ती–मालमत्ता–घेऊनच जा. तुम्ही केव्हा ना केव्हा 'जाणार' हे नक्की होते. इस्रायलशी इमान राखून तुम्ही इथे राहणे हे आम्हांला व तुम्हांला दोघांना हिताचे नाही. कृतीने, वाणीने या देशाच्या घटनेशी, अस्मितेशी बेईमान असलेली माणसे या देशात सुखाने अजून नांदू दिली जात असताना ज्यू बंधूंनो, तुम्हांला इथे मुळीच त्रास दिला गेला नसता हे काय सांगायला हवे? अखिल भारतीय जमाते–इस्लामचा अध्यक्ष सय्यद हमीद हुसेन याने २६ मार्चला हुबळीला वृत्तपत्रकारांच्या परिषदेत सांगितले–

"आमचा निधर्मी तत्त्वाला विरोध आहे. महंमद हा अखेरचा प्रेषित होता आणि सर्वांनी त्याच्याच शिकवणुकीप्रमाणे या देशात वागले पाहिजे. म्हणून मौलाना आझाद काय किंवा राष्ट्राध्यक्ष झाकीर हुसेन काय हे मशिदीत जातात म्हणून त्यांना मी मुसलमान समजत नाही. कुटुंबनियोजन हे मुसलमानांनी कधीही पत्करू नये."

ज्यू लोकहो, तुम्हांला जो शहाणपणा सुचला तो या सय्यद हमीदला सुचत नाही. त्याला हवा असलेला 'स्वर्ग' पाकिस्तानात आज उपलब्ध असताना हा माणूस इथेच निधर्मी शिष्यवृत्तीवर सुखाने जगणार आहे. कारण 'कोचीनचे राजे' सध्या दिल्लीला राज्य करीत आहेत.

## ☐ काँग्रेस–रिपब्लिकन युतीचा विजय !

गुजराथ विधानसभेच्या सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे तैल-चित्र लावावे, असा ठराव धरमसी नावाच्या सदस्याने मांडला असता, गुजराथ राज्याचे एक मंत्री चिमणभाई पटेल म्हणाले,

"हा ठराव पास झाला तर लौकरच विधानसभेचे सभागृह म्हणजे 'चित्रांचे प्रदर्शन' होईल. भंगी कष्टमुक्ती, हरिजनसेवा ही डॉ. बाबासाहेबांची कामे गुज-राथ सरकार करीत असताना तैलचित्राची जरुरी नाही."

यावर एक सभासद रागाने उठून म्हणाले, "जर डॉ. आंबेडकर झाले नसते तर भारताला घटनाच मिळाली नसती."

हे मात्र फार झाले. चिमणभाईंनी लगेच ताडकन सांगितले– "डॉ. आंबेडकरांनी घटना लिहिली हे खरे आहे, परंतु ते झाले नसते तर घटनाच लिहून झाली नसती असे म्हणणे हे या देशाच्या बुद्धिमत्तेचा अपमान करणे आहे. लोकसभेच्या सभा-गृहात, इतकेच नव्हे तर महाराष्ट्र विधानसभेतही, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र नसताना इथे गुजराथेत हा आग्रह का?"

चिमणभाईंनी विरोधी पक्षांपुढे टाकलेला हा 'चारा' फारच मोलाचा होय. डॉ. आंबेडकर हे महाराष्ट्रीय. तरी महाराष्ट्र विधानसभेत त्यांचे तैलचित्र नाही. अगदी महापुरुष झाला तरी त्याचा प्रांत...वगैरे पाहिलाच पाहिजे! चिमण-भाईंच्या मदतीला मग परमार या नावाचे काँग्रेस सदस्य धावले. ते म्हणाले–"हरि-जनांना बुद्ध धर्माचा स्वीकार करायला सांगून डॉ. आंबेडकरांनी हरिजनांचे मोठे अहितच (Dis-service) केले आहे. यामुळे हरिजन म्हणून मिळणाऱ्या सर्व सव-लती मात्र हरिजन गमावून बसले!"

श्री. परमार यांचा युक्तिवाद अगदी बरोबर आहे. सरकारला 'हरिजनसेवा' करायला काही हरिजन शिल्लक नकोत का? सगळेच जर बुद्ध झाले तर मग सेवा तरी कुणाची करायची? प्रथम डॉ. आंबेडकर मुसलमान धर्म स्वीकारणार होते. डॉ. आंबेडकर मुसलमान झाले असते तर बहुधा त्यांच्या तैलचित्राचा ठराव चिमण-भाईंनी एकमताने पास करवून घेतला असता; कारण मुसलमानाला प्रांत नसतो! खरे की नाही चिमणभाई?

महात्माजी हे बुद्धाचा अवतार! महात्माजींवर गुजराथचे विलक्षण प्रेम आहे. परंतु समस्त हरिजन जनतेला बुद्ध करणाऱ्या डॉ. आंबेडकरांवर मात्र गुजराथचा राग का? ४३ विरुद्ध ७२ मतांनी डॉ. आंबेडकरांचे तैलचित्र विधानसभेत लाव-ण्याचा ठराव फेटाळून का लावला गेला?

एका परीने हा ठराव फेटाळला गेला हे ठीक झाले. रणछोडभाई, चिमणभाई, हसमुखभाई यांच्या भाऊगर्दीत डॉ. आंबेडकरांसारखा क्रांतिकारक गुदमरलाच असता. काँग्रेस-रिपब्लिकन युतीचा विजय असो!

—ग्यानबा

# तांदळाची उपलब्धता कशी वाढेल?

१९६७–६८ या सालात तांदळाचे देशातील उत्पादन ३ कोटी ७९ लाख टन होते एवढा तांदूळ उपलब्ध होण्यास सुमारे ५।। कोटी टन भात (पॅडी) लागते. १९६३ ते १९६८ या काळात भाताचे सरासरी वार्षिक उत्पादन ५।। कोटी टन होते. उत्पादन-वाढीच्या विविध योजनांमुळे भाताचे वार्षिक उत्पादन येत्या ५ वर्षांत ८ कोटी टनांवर जाईल असा अंदाज आहे. भाताचे उत्पादन वाढविण्याबरोबरच तेवढयाच भातापासून सध्यापेक्षा अधिक तांदूळ कसा मिळविता येईल, याचाही विचार चालू आहे.

भात सडण्याचे सध्याचे तंत्र टाकून देऊन आधुनिक तंत्र पूर्णपणे स्वीकारल्यास किमान १ कोटी टन तांदूळ जादा मिळेल, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. प्राथमिक पाहण्यांवरून असे दिसून आले आहे की, आधुनिक तंत्र वापरल्यास तांदळाचा उतारा २ ते ६ टक्क्यांनी जास्त पडेल. या तांदळात केरकचरा कमी असेल, तांदूळ फुटण्याचे प्रमाण कमी होऊन त्याची गुणवत्ता वाढेल व कुबट घाणीचे प्रमाणही कमी होईल. भात यांत्रिकरीत्या वाळविण्याची पद्धत व साठविण्याची नवी पद्धत यांमुळेही तांदळाची उपलब्धता अधिक वाढेल.

सध्या हलर पद्धतीच्या गिरणीत तांदळाचा उतारा ६० टक्के पडतो तर शेलर-पद्धतीच्या गिरणीत हा उतारा ६५ टक्के पडतो. आधुनिक भात–गिरणीमध्ये तांदळाच्या उताऱ्याचे प्रमाण ६८ ते ७२ टक्क्यांपर्यंत असते. देशात हलर पद्धतीच्या गिरण्यांची संख्या ४३ हजारांचेवर आहे व त्यांची तांदूळ सडण्याची कार्यशक्ती ४ कोटी टनांचेवर आहे. तांदळाचा उतारा वाढवावयाचा असेल तर या सर्व गिरण्या मोडीत काढल्या पाहिजेत; परंतु हे काम गुंतागुंतीचे आहे. येत्या ५ वर्षांत ६४०० भात गिरण्यांमध्ये आधुनिक तंत्र सुरू करण्याचा कार्यक्रम आहे. अर्थात यासाठी पुरेसा पैसा उभा करणे अडचणीचे आहे.

सहकारी क्षेत्रात सध्या ७७८ भातगिरण्या असून त्यांची कार्यशक्ती २५ लाख टन भात सडण्याची आहे. चौथ्या योजनेत या क्षेत्रात १ ते २ टन कार्यशक्तीच्या

३०० भात गिरण्या सुरू करण्याची योजना असून त्यांपैकी २०० भात गिरण्यांचे आधुनिकीकरण करण्याचा विचार आहे. या सर्व कामाला २४ कोटी रुपये खर्च येणार असून त्यामुळे सहकारी क्षेत्रात ५० लाख टन तांदूळ सडण्याची एकूण कार्य-शक्ती निर्माण होईल.

दर ताशी ४ टन भाताचे रूपांतर तांदळात करण्याची कार्यशक्ती असलेल्या २४ आधुनिक भात गिरण्या सुरू करण्याचे काम सध्या अन्नमहामंडळाने हाती घेतले आहे. येत्या ५ वर्षांत अशाच २५ गिरण्या सुरू करण्याची महामंडळाची योजना आहे. त्या योगे दर वर्षी सुमारे १२ लाख टन भातापासून आधुनिक तंत्राने तांदूळ निर्मिती करता येईल.

भातसडणीच्या आधुनिक तंत्राबाबत खरगपूर येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' या संस्थेत बरेच संशोधन चालू आहे. खाजगी क्षेत्रातील भात गिरण्यांच्या आधुनिकीकरणासाठी बँका व अन्य आर्थिक संस्था यांच्यामार्फत १० कोटी रुपयांची कर्जे देऊन आधुनिकीकरणाचा ५० टक्के खर्च भागविण्याची संस्थेची योजना आहे. खाजगी क्षेत्रातील भातगिरण्यांपैकी बऱ्याच गिरण्या अकार्यक्षम असून आर्थिक दृष्ट्या डबघाईला आल्या आहेत. त्यामुळे तांदळाचा जेवढा उतारा पडावा तेवढा पडत नसून तांदळाची एकूण उपलब्धता वाढविण्याच्या प्रयत्नांत अडथळा येत आहे. यांपैकी निदान ४ हजार गिरण्यांत तरी भातसडणीचे आधुनिक तंत्र अंमलात आणण्याच्या योजनेस अत्युच्च प्राधान्य देऊन येत्या ५ वर्षांत ती पूर्ण केली पाहिजे

भातसडणीच्या आधुनिक तंत्रासाठी आवश्यक अशी यंत्रसामग्री तयार करण्या-साठी भारत सरकारने काही उपाययोजना केल्या आहेत. त्यासाठी मुंबईची


**क्र. ४७ मध्ये बिनचूक विजेत्यांनी प्रत्येकी रु. ११,००० जिंकले.**

**( १ ) श्री. हसू पटेल** C/o जग्गीस केमिस्ट, गुजराती बझार, सागर (एम्. पी.);

**( २ ) श्री. कृष्णकांत ठाकोरदास जरीवाला.** ११/१३९६ नानावट, नवलाशा कोठाजवळ, सुरत.

**क्र. ४९ मध्ये जिंका रु. ५०,०००**

प्रवेश–पत्रिका आणि पावत्या ठिकठिकाणी एजंटांकडे मिळतात.
अधिकृत एजंट : श्री. धुळालाल शाह, बुधवार चौक, पुणे २.

'दांडेकर ब्रदर्स लिमिटेड', कलकत्त्याची 'दामोदर एंटरप्राईज' व मद्रासचे 'बिन्नी इंजिनीयरिंग वर्क्स लिमिटेड' या तीन कंपन्यांना औद्योगिक परवाने देण्या-बाबत विचार चालू आहे. भातसडणीच्या यंत्रसामग्रीचे उत्पादन करणारी जगातील सर्वांत मोठी कंपनी 'शूले' (पश्चिम जर्मनी) हिच्यामध्ये किर्लोस्कर उद्योगसमूहाने मोठी गुंतवणूक केली असून तिचा कारभार हाती घेतला आहे. याखेरीज सध्याच्या अशा प्रकारच्या यंत्रसामग्रीच्या उत्पादकांना आधुनिक यंत्रसामग्री व तिचे सुटे भाग तयार करण्यासाठी उत्तेजन देण्याची योजना आहे. भात सडणीचे आधुनिक तंत्र सुरू करण्याचा वरील कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यासच अंमलात आणता येईल. त्याकरिता भारत सरकारने नेमलेल्या 'चँडी' समितीने खरगपूर येथे भातसडणी तंत्र केंद्र सुरू करण्याची शिफारस केली आहे. या शिफारशीचा विचार चालू असून खरगपूर येथे या तंत्राचे शिक्षण देण्यासाठी एक अल्पमुदतीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी ५ वर्षांत सुमारे दीड कोटी रुपये खर्च येईल.

ॲग्रिकल्चरल इंजिनीयरिंग व संलग्न क्षेत्रांतील उच्च शिक्षण व संशोधन यांसाठी फोर्ड फौंडेशनने ५ लाख डॉलर्सची रक्कम खरगपूर येथील संस्थेस मंजूर केली होती. ही योजना ऑगस्ट १९६४ मध्ये सुरू झाली व तिचा पहिला टप्पा १९६७ अखेर पुरा झाला. दुसरा टप्पा १९७० साली पुरा होईल. भातापासूनच्या तांदळाचा उतारा वाढविण्यासाठी खरगपूर येथे नवनवीन यंत्रसामग्री शोधून काढण्यासाठी अनेक प्रयोग चालू असून काही प्रायोगिक चाचण्याही घेण्यात आल्या आहेत.

१९३२ साली भारतापासून ब्रह्मदेश निराळा झाल्यापासून भारत दरवर्षी २० लाख टन तांदूळ आयात करीत आहे. भातसडणीचे, वाळवणीचे व साठवणीचे आधुनिक तंत्र अंमलात आणण्याचा प्रयत्न काही प्रमाणावर तरी यशस्वी झाल्यास उपलब्ध भातापासूनच सुमारे ३० लाख टन तांदूळ जादा उपलब्ध होईल व तांदळाची आयात पूर्णपणे थांबविता येईल. ○



सोमवारी रात्री कृष्णाचे व अँकरचे प्रेत एकमेकांना मिठ्या मारून किनाऱ्यावर तरंगताना आढळले.



सुधाकर वसंत चिटणीस

# व्यथित

" कृष्णा, मासे नाय गावले ? बाजार ओम पडेल की रे ! "

" ओम कसा पडेल ? थोडे गावले की ! आज एक मोठा मामा आमाला गावला. "

" अग बय्यो ऽ गावला रे ! दाखव बघू." राधा बोलत होती, "आमच्या लहानपणी एक देवमामा गावला होता. दोन पुरुष लांब होता. किती वर्षांत असा मामा गावला नाय. "

" आमचा मामा एक ' वाव ' लांब हाय."

" कुठाय ? " राधाने तोंड मोठे करून प्रश्न विचारला.

" हा काय, जाळ्यात हाय. " असे म्हणून कृष्णाने जाळे गोळा करायला सुरुवात केली.

" चावट हाय मेल्ला ! " तिने माशाचे पाणी कृष्णाच्या अंगावर उडविले. तिच्या लक्षात आले की, मासे असलेल्या जाळ्यातच आपण बसलोय. ती चटकन उठली व मासे गोळा करून बाजाराला चालू लागली. तिच्या त्या पाठमोऱ्या आकृतीकडे कृष्णा टकमक पाहत उभा होता. तिची चाल निवटयाप्रमाणे चपळ होती. बांगड्याप्रमाणे पोटऱ्या भरल्या होत्या. त्याचे मन हरपले. हा फाल्गुन सरला की, चैत्रात राधेला आपल्या घरी आणावयाची. नवोढी राधा. हिरवा पोलका घातलेली, हिरवे लुगडे नेसलेली राधा कशी दिसेल ? राधेच्या सहवासात चोरून घालवलेले धुंद दिवस त्याला आठवले.

मागची कोजागरीची पौर्णिमा. जागरणे करून सर्वजण निघून गेले. आपण व राधा दोघेच राहिलो. राधाला घेऊन समुद्रकिनारी आलो. समुद्राला भरती आली होती. सागर उसळत होता. 'घो ऽ घो ऽऽ घो ऽऽऽ' आवाज करत लाटा वेटोळे वेटोळे घेऊन किनाऱ्यावर येत व नारळ फुटल्याप्रमाणे फुटून चौफेर पाणी उधळत. त्या लाटांच्या खेळांकडे पाहत राधा बोलली, " कृष्णा, समुद्राला भरती कशी येते ? "

" भरती चंद्राच्या कलेवर येते. चंद्रकला पूर्णाकार दिसली की, समुद्राला प्रेमाने भरती येते. तो तिच्या मीलनासाठी आतुर होतो. " त्याने चटकन राधाकडे पाहिले, ती लाजली व त्याला बिलगली. तो स्पर्श आजही त्याला जाणवत होता. त्याला हेही आठवले, भरतीत कोळी जाळे टाकण्यासाठी समुद्रात उतरत नाहीत. आपण प्रौढीने राधाला बोललो, " मी त्या भरतीतही पोहून दाखवितो– " असे म्हणून आपण समुद्राच्या बाजूला धावायला लागल्यावर राधाने आपल्या कमरेला मिठी मारली व तिच्या अंगावर आपले अंग झोकले गेले. राधा दूरवर दिसेनाशी झाल्यावर तो धुंदीतून जागा झाला. त्याने जाळे आवरले व किनाऱ्यावर वाळूत वाळण्यासाठी पसरले. आज होळीचा दिवस. लवकर घरी जाऊन रात्रीच्या तयारीला लागावयाचे होते. पुरुषभर हात होळी रचायची होती. त्यासाठी अख्खा सुकलेला माड पाडायला हवा.

घरी येऊन दोन घास खाल्ले व झोपडीच्या बाहेर येऊन त्याने आपल्या शेजाऱ्याच्या सवंगड्यांना हाळी दिली, " अवं म्हाद्या, धोंड्या कुठाय हाय रं ऽ ऽ ? आज होळी नाय जागायची ऽ ऽ ? "

" जागायची न्हवं ! " झोपडीच्या बाहेर डोकी काढत सवंगड्यांनी साथ दिली.

" मगशान गाडीभर लाकडं गोळा करायला कोनी जायचं ? " आणि ते सवंगडी गावभर लाकडे गोळा करायला निघाले.

राधाने आज मासळीबाबत गिऱ्हाइकांशी घासाघीस न करता हात मोकळा सोडला होता. ही मासळी विकून आपण कधी घरी जाऊ असे झाले होते. तिचे मन रात्रीच्या धुंद नाचगाण्यांची स्वप्ने पाहत होते. त्यांच्यांतच मन हरपले होते. दररोज काचकुच करणारी राधा आज मासळी लवकर संपवण्याच्या मागे लागली

होती. आज तिला आपल्या आवडत्या सख्याहरीबरोबर मनमोकळपणान नाचावयास मिळणार होते. रात्र रंगणार होती. तिच्या मनाची धांदल तिच्या मैत्रीणींच्या लक्षात यावयास वेळ लागला नाही. एकीने तिला चिडविण्यासाठी लकेर मारलीच–

" सखी मन हरपलं ग,
तुझे होलीच्या पुनवेत ! "

राधाने लटक्या रागाने तिच्याकडे पाहिले व रिकामी पाटी धुवून घरी येण्यास ती लगबगीने निघाली.

कृष्णाने, त्याच्या सवंगड्यांनी, अर्धा पुरुष खोल खड्डा खणला. त्यात मोठमोठी ओंडकी रचली. त्यात पेंढा टाकला व आंब्याची डहाळी लावली गेली. बाजूला पाण्याचा सडा मारला गेला.

सूर्य सिंधुसागरात बुडाला तसा कृष्णाच्या धांदलीला जोर चढला. गावची पोरे जमा झाली. बायकामाणसे गोळा झाली. राधा एका बाजूला उभी होती. होळी पेटवली गेली. अग्नीच्या ज्वाला वर गगनाला भिडल्या. ठिणग्या फट्फट् उडत वर जात होत्या. पोरांनी आरोळी ठोकली. म्हाताऱ्यांनी मूठ वळवली, " चला, मारारे पोरांनो बोंबा– " असे म्हणून मूठ तोंडावर मारावयास सुरुवात केली. बोंबांनी सर्व आसमंत दुमदुमून गेले. नैवेद्य आणला गेला.

चंद्र बराच वर आला होता. डफाच्या आवाजाने आणि नाचणाऱ्यांच्या पायांतील घुंगरांच्या नादाने आसमंत दुमदुमून गेला होता. कृष्णाच्या व राधाच्या पार्टीची जुगलबंदी रंगात आली होती. मध्येच आसमंतात गुलाल उधळला जात होता. आसमंत लाल धूसर होत होते.

" घुंगरामध्ये घुंगर मिसळतं, गुलाल उधळतो गगनात–
होळीच्या पुनवेला, कोळीण नाचते जोशात ! "

गाण्याच्या सुरात नाचाला रंग चढला होता. लांबून म्हातारा म्हापद्या जोरात ओरडत येत होता, " अ पोरानू, तिकडं समंदर दाही जिभा वर करून माणसं गिळतोय. आणि तुम्हांला इकडे नाचगाणी कशी सुचतात ? "

आनंदावर वीज कोसळली, घुंगुरे चौफेर उधळली गेली. कृष्णा पुढे येऊन म्हापद्याला बोलला, " दादा, काय झालं ? "

" अरे, लवकर मचवा काढ, तिकडे मी सहज समुद्रावर गेलो होतो; तर कोण्या तरी माणसांचा ओरडण्याचा आवाज येत होता. म्हणून धावत इकडे आलो."

कृष्णा, त्याचे सवंगडी सर्वजण समुद्राकडे धावले. त्यांच्या पाठोपाठ बायकापोरे, चिमुरडी पोरे धावली. आज होळी पौर्णिमेला सिंधुसागराला तुफान भरती आली होती. सागर चहूबाजूंनी उसळला होता. पाण्याच्या मोठमोठ्या लाटा अक्राळविक्राळ रूप घेऊन 'घों ऽऽ घों ऽऽ' आवाज करीत वेटोळे वेटोळे घेत किनाऱ्यावर

येत व धडाधड नारळ फुटल्याप्रमाणे फुटत; पाणी दूरवर किनाऱ्यावर पसरे. जिथे लहान पोरे खेळत असत, ते शिवाचे छोटेसे शिवाटेक मंदिर पार बुडून गेले होते. कृष्णाने बांधलेला मचवा पाण्यात सोडला. अनेक होड्या, मचवे पाण्यात सोडले गेले. दूरवर पाण्यात शोधाशोध सुरू झाली. राधा दूरवर पाण्यात जाणाऱ्या कृष्णाच्या मचव्याकडे एकटक पाहत उभी होती. ऊर भीतीने थरथरत होते. तिने जेव्हा कृष्णाला जाण्यास मज्जाव केला, तेव्हा तो म्हणाला, " अग वेडे, तुझ्या म्हाताऱ्या बापाच्या–म्हापद्याच्या–अंगात ह्या प्रसंगाने वारे संचारले आणि मी तरणाताठा पोर बांगड्या भरून काय घरी बसून ?"

अँकर ओडेगार जेन्सन हा बेचाळीस वर्षांचा नॉर्वेजियन गृहस्थ ऑस्ट्रेलियात स्थायिक होण्यासाठी नॉर्वेतील क्राजेरो गावाहून मोटरबोटीने निघाला होता. त्याचे वय बेचाळीस वर्षांचे होते; त्यांपैकी चोवीस वर्षे त्याने समुद्र-सफरीवर काढली होती. अँकरसमवेत त्याची पत्नी, एक मुलगी लिल् व लिल्‌चा सोळा वर्षांचा भाऊ हॅन्स असे होते. गेल्या नोव्हेंबरमध्ये त्यांनी नॉर्वे देश-सोडला. स्वीडन, डेन्मार्क, जर्मनी, फ्रान्स व इटली हे देश पाहून ते मुंबईच्या जवळ आले. मकाला हे सिंधु-सागरातील बंदर सोडल्यानंतर दहा दिवसांत ते मुंबईत येणार होते. परंतु लाँच-मध्ये काही यांत्रिक बिघाड झाल्याने या प्रवासास त्यांना चार दिवस जास्त लागले.

होळी पौर्णिमेच्या सायंकाळी त्यांची लाँच मढ बेटाजवळून जात होती. किनाऱ्या-पासून फार तर एक मैल अंतरावरून ते जात असावेत. किनाऱ्यावरील कोळी कुटुंबाच्या हालचालीही त्यांना दिसत होत्या. त्या वेळी समुद्र खवळलेला होता. समुद्राला भरती आली होती. चारी बाजूंनी तो उसळला होता. पाण्याच्या मोठ-मोठ्या लाटा किनाऱ्यावर आपटत होत्या. लिल् व तिची आई एल्स यांनी लाइफ बेल्टस् चढविले. तेवढ्यात एक प्रचंड लाट आली व तिने लिल् समुद्रात खेचली गेली. लिल् लाटांशी झगडत आहे असे दिसताच तिच्या वडिलांनी भर समुद्रात उडी घेतली. पण त्याला लाइफ बेल्ट घालण्याचे भान राहिले नाही, हे अँकरच्या पत्नीच्या लक्षात आले. म्हणून तिने एक लाइफ बेल्ट त्याच्या दिशेने फेकला. दुर्दैवाने तो त्याला पकडता आला नाही. इतक्यात आणखी एक लाट आली व तिने एल्स-लाही समुद्रात खेचले. ते तिघेही एकत्र आले व बोटीच्या दिशेने जाण्याचा यत्न करू लागले. लाटांचा जबरदस्त आघात होत होता. त्या आघातांनी अँकरला पत्नीपासून व मुलीपासून दूर नेले.

बोटीवर आता फक्त हॅन्स होता. तो रेडिओद्वारा मदतीचा प्रयत्न करीत होता. सूर्य पाण्यात डुबला; काळ्या छाया समुद्रावर पडू लागल्या. आई-वडील व बहीण कुठे दिसतात का, याचा शोध तो सारखा घेत होता. तो हताश झाला. अचानक फाड्कन् आवाज झाला. बोटीच्या चिंधड्या होतात की काय असे क्षणभर त्याला वाटले. त्याने समोर पाहिले; बोट खडकावर आपटली होती व तिला भलेमोठे

भग दाड पडले होते. हॅन्स जीव बचाविण्यासाठी त्या खडकावर उतरला व तेथून त्याने मोठ्याने हाका मारण्यास सुरुवात केली. इकडे हॅन्सची आई व वहीण यांनी किनारा गाठण्याचा कसोशीने प्रयत्न चालविला होता. पण खवळलेल्या समुद्रामुळे त्यांना किनारा गाठणे अशक्य होत होते. सर्व रात्र त्यांनी खवळलेल्या पाण्याशी झगडण्यातच घालविली.

हॅन्सच्या हाकेला सोमवारी पहाटे म्हणजे म्हणजे लिल् समुद्रात पडल्यापासून बारा तासांनी साद मिळाली. म्हापद्याला त्यांचे ओरडणे ऐकू गेले. त्याने सर्वांना गोळा केले. कृष्णाने समुद्रात उडी टाकली व पोहत जाऊन इतर सर्व कोळ्यांनी मिळून हॅन्सला, त्याच्या आईला व वहिणीला किनाऱ्यावर सुरक्षित आणले. अँकर सापडला नाही म्हणून त्याचा शोध घेण्यासाठी कृष्णाने परत त्या खवळत्या समुद्रात उडी मारली. लाटांशी झगडत तो अँकरचा शोध करीत होता.

कृष्णाही बेपत्ता झाला म्हणून त्याची सर्वजण शोधाशोध करू लागले. दुपारपर्यंत त्याचा शोध लागला नाही. रणरणत्या उन्हात समुद्राकडे पाहत राधा बसून राहिली होती. रडून रडून तिचा चेहरा म्लान झाला होता.

सोमवारी रात्री कृष्णाचे व अँकरचे प्रेत एकमेकांना मिठ्या मारून किनाऱ्यावर तरंगताना आढळले.

झोपडीच्या बाहेर समुद्रावरून आणलेल्या कृष्णाचे प्रेत होते. राधाला भडभडून आले. ती जोरात हात खांबावर मारून डोके आपटायला लागली. तिच्या कपाळावरचे केस अस्ताव्यस्त झाले होते; कुंकू साफ पुसले गेले होते व हातांतील हिरवा चुडा फुटून, रक्ताबरोबर बांगड्यांच्या काचा खाली ओघळत होत्या. ○




# पुस्तके

**मळणी । दोन प्रतिक्रिया । । । । । ।**

गेल्या तीन-चार महिन्यांच्या काळात लघुकथा-लेखक प्रा. रा. रं. बोराडे यांचे नाव वृत्तपत्रे व मासिकांतून दोन कारणांस्तव विशेष गाजले. एक म्हणजे त्यांना लातूरला झालेल्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या संमेलनात कथाकथनाच्या कार्य-क्रमासाठी बोलावण्यात आले नव्हते व दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना या वर्षी (त्यांच्या 'मळणी' या कथासंग्रहाला) महाराष्ट्र राज्य सरकारचे पारि-तोषिक मिळाले.

## स्पेशल बोराडे टच असलेल्या कथा

१

प्रा. जीवन देसाई

महाराष्ट्रात लेखक म्हणून मान्यता मिळावयाची असेल तर तो लेखक कोणत्यातरी प्रसिद्ध लेखक, समीक्षक अथवा प्रकाशकाच्या कंपूतला असला पाहिजे, अथवा एकदम सर्वांना धक्का देईल, स्तंभित करील असे लिखाण तरी त्याच्या हातून व्हायला पाहिजे. आणि हे दोन्ही मार्ग एखाद्यासाठी कठीण असले तर त्याने भरमसाट लेखन केलेले पाहिजे व मुख्य म्हणजे ते प्रसिद्ध झाले असले पाहिजे. श्री. रा. रं. बोराडे या तिन्हींपैकी कुठल्याही प्रकारात न मोडणारे पण मान्यता पावलेले लेखक आहेत असे

म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरू नये. सातत्याने पण स्वतःचे वैशिष्टय राखून लेखन करणारे जे बोटांवर मोजण्याइतके लेखक मराठवाडयात आहेत त्यांच्यापैकी प्रा. बोराडे एक आहेत. आपण चांगले लिहू शकतो याबद्दल आत्मविश्वास असला व लिहिल्याशिवाय राहू नये एवढया उर्मी मनात दाटून येत असल्या तरी आपण जे काही लिहितो ते प्रसिद्ध होणे सुरुवातीच्या काळात तरी किती अवघड असते हे बोराडे यांनी अनुभवलेले असावे. आधी मराठवाडयाबाहेर प्रसिद्धी मिळाली म्हणजे मग मराठवाडाही आपल्याला लेखक म्हणून ओळखू लागतो हाही अनुभव बोराडे यांच्या पदरी असावा असे वाटते.

## अनुभवसमृद्ध कथा

बोराडे यांच्या 'मळणी' या संग्रहाला कोणाचीही प्रस्तावना नाही. त्यामुळे संग्रह वाचल्याशिवाय त्याबद्दल काही मत बनवणे व त्याच्या आधारे एक झकास 'परिक्शान' ठोकून देणे अशक्य आहे. मी 'मळणी' हा कथासंग्रह सहज म्हणून वाचायला घेतला आणि वाचून संपवल्यानंतर वाटू लागले की, त्याबद्दल आपल्या मनातील विचार कागदावर उतरविले पाहिजेत.

बोराडेंच्या कथा वाचताना प्रथम काही जाणवत असेल तर ते हे की त्यांची भाषा ही मुद्दाम लिहिलेली ग्रामीण भाषा नाही. ग्रामीण वातावरण, तेथील चालि-रीती, सर्वसामान्यांचे ग्रह, दुराग्रह व त्यांचे अनुभव या सर्व गोष्टींशी समरस झाल्यानंतर (किंवा आधीपासूनच समरस असल्यानंतर) जी भाषा सहज तोंडी यावी ती भाषा बोराडयांनी वापरलेली आहे. कथांमधून पात्रांच्या मनातील आंदोलने सूचकपणे व्यक्त करण्यात बोराडयांचा हातखंडा आहे. बोराडे यांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे आपल्या कथांतून जी पात्रे ते रंगवतात त्या त्या पात्रांचे व्यक्तिमत्त्व हे सलगपणे वाचकांच्या नजरेसमोर उभे राहते. कथेनुरूप एका पात्राचे साह्य दुसऱ्याचे वैशिष्टय स्पष्ट करण्यासाठी होत असेल, पण एखाद्या पात्राचे व्यक्तिमत्त्व उठून दिसावे म्हणून दुसऱ्या एखाद्या पात्रावर अन्याय बोराडयांच्या हातून होत नाही. म्हणूनच की काय, त्यांच्या कथेतील पात्रे स्वतःचे जीवन आपापल्या परिस्थिती-नुसार व विचाराप्रमाणे जगत असतात, आणि तसे ते जगत असताना अत्यंत स्वाभाविकपणे जे घडू शकते ते त्यांच्या कथेत घडते. एका चक्रात फिरणारी किंवा एकाच विशिष्ट धाग्यात गुंफलेली त्यांची कथा आहे असा आरोप मला येथे करा-वयाचा नाही. त्यांची कथा ही अनुभवांनी समृद्ध आहे. निरनिराळया प्रकारचे अनुभव, त्या अनुभवांचे वैचित्र्य त्यांच्या कथेत आढळते. पण तो अनुभव वाचकांनाही सहजपणे जाणवून देण्याचे कौशल्य बोराडे यांच्या शैलीत आहे.

त्यांच्या काही कथा मुलांच्या तोंडून वदवलेल्या आहेत. मुलगा आपल्या 'बा'ची अथवा 'माय'ची वागणूक कशी आहे, त्यांचे विचार कसे आहेत यांविषयी विचार करून स्तंभित होत असलेला, त्यातील कार्यकारणभाव समजून घेण्याचा प्रयत्न करीत

असलेला दिसतो. त्यातूनच कथा खुलत जाते. अशा कथा वाचत असताना आपण त्या मुलाच्या भूमिकेत शिरतो; एवढेच नव्हे तर लेखकही त्या मुलाच्याच भूमिकेतून घटनांची संगती लावीत असलेला दिसतो. कधीकधी मात्र या मुलांच्या मागे बोराडे उभे आहेत हे जाणवते. त्यामुळे त्यांच्या कथेतील मुलगा हा त्याच्या वयाला न साजेल एवढा समंजस, चौकस व विचारी वाटतो. साध्या प्रसंगांतून व सहज संवादांतून गहन अर्थ सुचविण्याचे कसब बोराडयांमध्ये आहे. असे संवाद लिहिताना बोराडयांची प्रतिभा बहराला येते. अत्यंत सुंदर अशा प्रतिमा साकार होतात. त्यांच्या 'भेग' या कथेत उतारवयाकडे झुकणाऱ्या पण लेकरू व्हावे म्हणून दुसरे लग्न केलेल्या माणसाचे दुःख त्यांनी सहजपणे व्यक्त केले आहे.

बा म्हणाला, "तरी म्या तवाच सांगितलं व्हतं, उगं कुन्या बिचारीच्या आयुष्याचा खेळखंडोबा करू नका म्हनलं व्हतं. पर तवा आयकिलं न्हाई माजं कुनी. घरात दिवा असावा म्हणून दिवा लावला आन आता दिव्यासाठी तेल जाळीत बसायचा वखत आलाय." पुढे याच कथेत 'माय' लसनाची चटणी खास 'बा'–करिता तयार करते. तोही आवडीने खातो. 'माय' स्वतः मात्र आळनी खाते. 'बा'ला परातभर दूव प्यायला लावते. शेवटी 'बा' भजनाला निघून जातो. वापस घरला झोपायला यायची विनंती 'बा' मानीत नाही. 'माय' गुडघ्यात मान खुपसून रडते. शेवटी दोनएक पायल्या दळण दळायला घेते. मुलगा विचारतो, "तू झोपत न्हाईस व्हय माय?"

जात्यात घास घालीत माय म्हणाली, "कसी झोपू बावा! देवानं एव्हडं बळ दिलंया अंगात. ते जिरवायला पायजी की कुठंतरी." आसं म्हनून माय जातं वडाया लागली...माय दळाया लागली. घराघरा जातं वाजाया लागलं. दान्याचा भुगा कराया लागलं आन जात्याच्या पाळूतून भुळूभुळू पीठ गळाया लागलं....

## बांध

बोराडे यांची कथा संपते. माणसं आपले दुःख गिळून टाकण्याचा प्रयत्न कसा करतात ते बोराडेंनी समर्थपणे दाखविले आहे. 'लागेबांधे' या कथेत भावाला आपला संशय आला हे समजताच घर सोडून शेतावरच येऊन राहणाऱ्या विधुर तात्याबाचं चित्र रंगविताना त्याच्या मनातील भाऊ व भावजयीविषयीचं प्रेम आणि आपली भावजय आपल्या मुलावर आईसारखी माया करते हे पाहून तिच्याविषयी वाटणारा आदर, आपला भाऊ, भावजय, मुलगा आणि आपण–यांच्यांतील अतूट लागेबांधे (संबंध)–सर्वकाही स्पष्ट रीतीने वाचकांपुढे लेखकाने ठेवले आहे. या संग्रहातील 'बांध' ही कथा तरुण मने आणि वृद्धांच्या मनातील घराण्याविषयीचा अभिमान, अहंगंड व उपचारांचा दुराग्रह यांच्यांतील अदृश्य बांध वाचकांसमोर ठळकपणे उभा करते. इवायांतील गैरसमजामुळे एका गावात राहूनही परस्परांना भेटू न शकणाऱ्या पतीपत्नींची मनोव्यथा बोराडयांनी शब्दांत अचूक पकडली

आहे. स्वतःच्या वडिलांची भाकर शेतावर नेऊन पोचविण्यासाठी बाहेर पडलेल्या पत्नीची भेट होताच विश्वनाथ तिला आपल्या शेतावर घेऊन जातो. तिला टव्हाळ, कोवळी वाळकं मुद्दाम आणून प्रेमानं खाऊ घालतो. दोघांनाही एकमेकांजवळ राहावंसं वाटत असतं. पण वडील तसं करू देत नाहीत. हा प्रसंग रंगविताना लेखकाने अत्यंत संयम राखला आहे. पात्रांचा तोल कुठेही ढळणार नाही याची दक्षता घेतली आहे.

ती एकदमच घाईला आल्यावानी म्हणते,

" आता चलते म्या. "

तो हसून तिच्याकडे पाहत म्हणतो, " थांब की उलीसं. "

" नगं, अंधार पडाया लागलाय. " तो अर्थपूर्ण नजरेने तिच्याकडे पाहत म्हणतो, " म्हणून तर थांब म्हनलं. "

ती एकदमच लाजते. गोड मुरका मारत म्हणते, " चला, तुमचं तर कायतरीच निगतं. " पुढे आपल्याही मनात असूनसुद्धा का नगं ते स्पष्ट करताना ती म्हणते, " उगं काय तरी घोटाळा हून वसंल, त्या बाबाच्या (आकाशाकडे हाताचा इशारा करीत) मनातलं काय सांगायला येतंय. उगं माझ्या पदरात फळ बांधून वसेल. तो म्हणतो ' ते फळ माजंच हाय म्हनून सांगंन लोकावान्‌ला " तेवढ्यावरही ती तयार होत नाही. ती म्हणते, " मोप इस्वास हाय; पर तेवढ्या बाबतीत काई बोलू नका. तेवढंच एक जपायचं माझ्या हातात हाय. " हा तोल साधणे हेच बोराड्यांच्या कथेचे यश आहे. अकस्मात झालेल्या भेटीनंतर निरोप घेऊन जाताना " तुमी बी जपा परक्रुतीला. म्या नांदायला यीन तवा आसंच्या आसं दिसलं पायजी बगा तुमी ! "—असं म्हणणारी पत्नी केवळ रूढी, उपचार व गैरसमज या पोटी खेड्यापाड्यांतून छळ सहन करणाऱ्या तरुणांची प्रतिनिधी म्हणता येईल.

खोटी प्रतिष्ठा काचेच्या भांड्यासारखी सांभाळण्यासाठी खेड्यांतील माणसे किती आटापिटा करतात हे ' लगीन ' या कथेत लेखकाने स्पष्ट केले आहे. पोरगा मोठा झाला म्हणून लगीन करण्याची घाई केली व शेवटी प्रतिष्ठा सांभाळण्याच्या नादात शेंबडी पोरगी गळ्यात बांधून घ्यावी लागली आणि ते पाहून त्या वयात आलेल्या पोराला काय वाटलं हे एका वाक्यात बोराडे सांगून टाकतात. पोरगी " लईच रडाया लागलीय हो. आमी गेल्यावर उगच तुमची बेजारी करील, " असं म्हणून पाहुणा लेकीला घेऊन जातो. आणि पोरगा—. . .—म्या मुकाट्यानं घरात गेलो. अंकावर पांघरून वढलं आन अंधारातच झोपलो. सारणीला गाडी कवा गेली हेसुद्धा ठावं झालं न्हाई मला. "

आपल्या अनेक कथांतून दुबळे पुरुष आणि असमाधानी किंवा असंतुष्ट बायका बोराड्यांनी चित्रित केल्या आहेत. वासना अतृप्त राहिली म्हणजे जगणे कसे अशक्य होते हे ' खेळ ' या कथेतील गुजाबाय हे पात्र सांगून जाते. पण त्याचबरोबर

जिवाला चटकाही लागतो तो तिचं दुःख किंवा त्याहीपेक्षा जास्त म्हणजे प्रबळ वासनेमुळे होणारी तिची कुचंबणा पाहून. " तू व्हय ? चल हू घराच्या भाईर. सोताजवळ हिंमत नव्हती तर कस्याला आनलंस मला हितवर ? असा का आर्ध्या-वरच खेळ टाकलास ?"—ह्या तिच्या प्रश्नाचे उत्तर कोणीच देऊ शकत नाही.

ज्या कथेवरून संग्रहाला नाव दिलं आहे ती ' मळणी ' ही कथासुद्धा बोराडेंची चांगल्या व समर्थ कथांपैकी एक आहे. पहिली बायको गेल्यावर वय जास्त नसताही केवळ आपल्या मुलाला पुढे सावत्र आईचा त्रास होऊ नये म्हणून लग्न न करणारा, जणू व्रतस्थ जीवन जगणारा माणूस असला म्हणून काय झालं; त्यालाही वासना आहेतच, त्याचेही मन कधीकधी उचंबळून येते. बायना खळ्यावर येताच त्यालाही राहवत नाही. तिला तो शेंदाड कापून खायला देतो, तिच्या तोंडाकडे बघत बसतो. पोराला वळजवरी मळन हाकायला लावतो व तिच्या सहवासात क्षण दोन क्षण घालवतो. ती निघून गेल्यावर पुन्हा तो मानावर येतो व " तुज्या जीवाला तोसीस लागूनी म्हनून जपतो रं. पर काय करू ? म्यावी एक मानूस हाय. मलावी माजं..." अशी कबुली देतो.

## सूक्ष्म निरीक्षणशक्ती

' उंबरठा ' या कथेत संस्कारांचे मानवी मनावर असलेले परिणाम लेखकाने समर्थपणे दाखविले आहेत तर ' आबाळ ', ' नेट ' व ' सौदा ' यांसारख्या कथां-मधून खेड्यांतील माणसे व्यवहाराच्या पातळीवर जगताना भावना, प्रेम, नाते इत्यादी कसे बाजूला ठेवतात ते समर्पकरीत्या वर्णिले आहे. या संग्रहातली ' पौरुष ' आणि ' माघारी ' या दोन कथा मात्र इतर कथांहून वेगळ्या व अत्यंत वैशिष्ट्य-पूर्ण अशा आहेत. शरीराने अधू व रूपाने ओबडधोबड असलेल्या सुकामधले पौरुष एक स्त्री आपली पत्नी या नात्यानें आपल्यावर प्रेम करते हे कळताच कसे अवचित जागे होते आणि स्वतःच्या आर्थिक व शारीरिक असमर्थतेच्या जाणिवेने नंतर आपो-आप कसे विझून जाते हे लेखकाने कथेत प्रभावीपणे मांडले आहे. ' माघारी ' या कथेतील नायकाची असमर्थता याहून जराशी वेगळी आहे. त्याने मोठ्या मुश्किलीनें बापू पाटलाच्या साह्याने बायकोला तिच्या बापापासून ओढून आणल्यानंतर जेव्हा बापू पाटीलच त्याच्या घरी शिरजोर होऊ लागतो तेव्हा बायकोला परत माहेरी पाठविण्याचा पर्याय त्याला स्वीकारावा लागतो हे दाखवून मानवी जीवनातील विसंगती लेखकाने उघड केली आहे. या कथेत किसनाने स्वीकारलेला पर्याय हाच एकमेव पर्याय असू शकतो काय, याबद्दल मतभेद होऊ शकेल. पण कथेची उभारणीच मुळात तो पर्याय गृहीत धरून करण्यात आली आहे.

बोराडेंच्या कथा वाचताना जाणवते ती त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती. कथानकाचे धागेदोरे गुंफण्याच्या नादात ज्या परिस्थितीत कथेतील घटना घडत आहेत त्या परिस्थितीचा आणि वातावरणाचा बोराडे कधीच विसर पडू देत नाहीत

एकमेकांशी बोलत असताना ती माणसे कामे काय करीत होती याचे ते वर्णन करतील किंवा मधूनच निसर्गवर्णनही आढळेल. खेड्यांतील माणसांच्या कार्यपद्धती, त्यांच्या सवयी, संभाषणांचे प्रकार इ. सर्व गोष्टी त्यांच्या निवेदनातून सुटत नाहीत. विशेष म्हणजे हे निवेदन कंटाळवाणे, वाचकांची कथानकाविषयीची उत्सुकता अडवून टाकणारे होणार नाही याचीही दक्षता घेतलेली असते.

—वाचं कुडतं माज्या अंगाला याया लागलं तवापासून माय उठल्या बसल्या बाच्या म्हागं पिरपिर लावाया लागली. " पोरट्याचं लगीन लवकर उरकून टाका. " म्हणून म्हणाया लागली.

रांडव बाईच्या कपाळावानी रानं पसरली होती.

घडोघडीला आभाळ भरून येत होते. पाणी घातलेली पखाल फुगावी तसं फुगत होते व टपटपा चार थेंब टाकून जात होतं.

परत पायाला काटा बोचावा तसं मला वाटलं.

काजळ पसरावं तसा अंधार पसरलेला आहे.—ही त्यांच्या कथेतील वाक्ये पाहिली म्हणजे बोराड्यांची विशिष्ट शैली ध्यानात येते. एकदम बुरखा फाडून निखालस सत्य उघड्यावर टाकणारे चमकदार संवादही ते काही वेळा लिहून जातात. उदा:–

" रामबाबाला इचारायचं व्हतंस. पंचांग बगून तो नक्की ठिकाना सांगतो म्हनं. "

" त्या मुड्द्यालाबी इचारलं की. "

" मंग काय म्हनाला ? "

" दुपारच्या पारी ये म्हनाला घरी कुनी नसताना. "

बोराडे यांच्या कथांबद्दल एका वाक्यात काही सांगायचे असेल तर ते असे सांगता येईल की—त्यांच्या कथांना स्पेशल बोराडे टच आहे, त्यांची कथा माडगुळकर, गोखले, गाडगीळ यांच्या प्रकारांत पूर्णपणे बसणारी नाही; पण दिलीप चित्रे, आनंद यादव, चिरमुले किंवा ए. जी. कुलकर्णी यांच्या कथांहूनही एकदम वेगळी आहे. त्यामुळे पंचाईत अशी आहे की बोराडेंना मॉडर्न कथाकार म्हणता येत नाही आणि जुन्यांमध्येही ते सामावले जात नाहीत.

एक मात्र खरे की बुलंद माणसे आणि अस्वस्थ करून सोडणारे अनुभव त्यांच्या कथांतून क्वचितच डोकावतात. बोराडे वाचकांना ग्रामीण वातावरणात घेऊन जातात, तेथील परिस्थितीशी आणि माणसांशी समरस करून टाकतात. त्यांच्या कथांतील माणसांची दुःखे, त्यांच्या भावना व त्यांची कृती या सर्व गोष्टींबद्दल एक प्रकारची आपुलकी निर्माण होते. पण कथा वाचून संपल्यानंतर तटस्थपणे त्या घटनांबद्दल विचार करावा लागावा एवढा गाढ ठसा वाचकांच्या मनावर उमटत नाही. ज्या क्रमाने त्यांच्या कथांत घटना घडत जातात त्या तशा घडणे अपरिहार्यच होते हेही प्रकर्षाने जाणवत नाही व त्या तशाच का घडल्या याबद्दल आश्चर्यही वाटत नाही. आपण त्याबद्दल 'कन्व्हिन्सड्' असतो; आणि लेखकही त्याच भूमिकेत आहे हे

आपल्याला जाणवते. बोराडयांची कथा हा 'किस्सा' नाही, पण माणसाला अस्वस्थ करून सोडण्याचे सामर्थ्यही तिच्यात नाही. कथा उलगडून दाखविताना साह्यभूत ठरणारे मनोविश्लेषण त्यांच्या कथेत जरूर आढळते. पण त्यावरच मुख्य भर असल्याचे कोणत्याही कथेत दिसत नाही. दोन पिढयांतील किंवा व्यक्तींतील संघर्ष हाच कथेतील मुख्य गाभा असल्याचे या संग्रहातील कोणत्याही कथेत आढळत नाही. तेव्हा बोराडयांची कथा ही सर्वसामान्य माणसांची दु:खे, त्यांची अगतिकता, त्यांचे एका चाकोरीतील जीवन व त्यांच्या जीवनातील अनेक प्रकारच्या घटना सहज उलगडून दाखविणारी अशी आहे. कुणाबद्दलही तक्रार नाही, कुणालाही दोष देऊन उपयोग नाही, आहे त्या परिस्थितीत शक्य होईल तसे जगणे – एवढाच मार्ग उपलब्ध आहे– अशा समंजस भूमिकेवर त्यांच्या कथांतील पात्रे वावरतात. आणि लेखकाला या माणसांबद्दल अपार आत्मीयता आहे हे वाचकाला जाणवते.

बोराडयांचे यश अपयश जोखण्याचा अधिकार व तेवढे सामर्थ्य माझ्यात नाही; आणि तशी इच्छाही नाही. अलिप्तपणे पण बळकट पायावर उभ्या असलेल्या मराठवाडयातील या तरुण कथाकाराची आधीच सर्वांना असलेली ओळख थोडीबहुत गाढ करता आली तर पाहावे, याच भूमिकेतून मी हे सर्व लिहिले आहे. ☐

# कसदार ग्रामीण कथा

२

निशिकांत मिरजकर

'मळणी' प्रकाशित होऊन एक वर्ष होऊन गेले. त्याला पारितोषिक मिळाल्यानंतर ते पुन्हा एकदा वाचनात आले आणि त्याविषयी लिहावेसे वाटले.

मराठी ग्रामीण कथेच्या प्रांतात व्यंकटेश माडगूळकरांचा वारसा रा. रं. बोराडे यांनी सहीसही उचलला आहे, असे 'मळणी'वरून जाणवते. इथे आपल्याला भेटतात ती ग्रामीण भागातली माणसे. अगदी खरीखुरी, आत्ता वावरणारी, जिवंत ठशाची माणसे. त्यांची सुखदु:खे, त्यांच्या विचारभावना, त्यांचे आरुषभावडे जीवन, त्या जीवनातले खरेखुरे जिवंत नाट्य. बोराडयांच्या या कथांत घटनांना

महत्त्व नाही असे नाही. उलट, सगळ्या कथांच्या केंद्रस्थानी घटनाच आहेत. चांगल्या ठसठशीत घटना आहेत. त्यांच्या वर्तुळातले कथानकही आहे; पण या घटनांना आणि कथानकांना उचलून धरून या कथांतली माणसे उभी आहेत. घटनांच्या संगेसोबतीने यातल्या माणसांच्या रेषा रेखाटलेल्या आहेत. व्यक्तित्वाच्या, भावविश्वाच्या रेषा. या रेषा ठळक असल्या तरी जाड नाहीत. व्यक्तींच्या, खेड्यांतल्या माणसांच्या मनाचे बंध इथे रेखाटलेले आहेत. पण या चित्रणात ढोबळपणा नाही. सोपेपणा नाही. गडद स्पष्टपणा असला तरी सवंग भडकपणा नाही. प्रत्येक व्यक्ती आणि जीवन वेगळेपणाने उभे राहिलेले आहे. व्यंकटेश माडगूळकरांचा वारसा जाणवतो तो या बाबतीत.

आनंद यादवांच्यापासून या कथा वेगळ्या पडतात. यादवांसारखी प्रतिमांची भाषा येथे नाही. संवेदना उलगडत अनुभवाची जवळीक साधण्याचा, प्रत्यक्ष अनुभवच शब्दांत ओतण्याचा तरल हळुवार प्रयत्न नाही. एखादी उत्कट घटना, एखादी तीव्र भावना, एखादा हेलावणारा प्रसंग घेऊन त्याच्या अनुषंगाने सरळसरळ व्यक्तीचे मन उघडे करून दाखवले आहे. भावना चित्रित केल्या आहेत. प्रथमपुरुषी निवेदन काही कथांत असले तरी ही शैली बरीचशी वस्तुनिष्ठ आहे. पण उत्कट सहानुभूतीचा आणि प्रामाणिक सूक्ष्म निरीक्षणाचा स्पर्श तिला झालेला असल्याने ती वस्तुनिष्ठताच गहिरी झालेली आहे. संवेदनांची भाषा न वापरतासुद्धा तिच्यात तरल हळुवारपणा आपोआप आलेला आहे. मनाला स्पर्श करण्याचे, हेलावून टाकण्याचे सामर्थ्य आलेले आहे. बोराड्यांच्या लेखनाचे हे यशस्वी वैशिष्ट्य आहे.

## लक्षात राहणारी माणसे

माणसांच्या स्वभावाचे, जीवनाचे कितीतरी नमुने ' मळणी 'मध्ये जिवंतपणाने रेखाटलेले आहेत. शेतातल्या कामाच्या व घरातल्या धान्याच्या परिस्थितीप्रमाणे सुनेची माहेरी पाठवणी करू पाहणारा व्यवहारी सासरा आणि माहेरी न्यायला आलेल्या बापाला निराश होऊन परत जाताना पाहून मन सैरभैर झालेली सासुरवाशीण, चार वर्षांत लेकीला मूल झाले नाही, म्हणून तिचा दुसरा घरोबा करू देऊ पाहणारा बाप आणि गावातल्या गुंड पाटलाच्या दहशतीने असल्या माहेरी पुन्हा बायकोला धाडणे भाग पडलेला अगतिक नवरा, पाटलाच्या बाहेरख्यालीपणासाठी नावापुरते लग्न करणारा नि पाटलाच्या कावेबाज उपकाराने दबून गेलेला निर्विकार अपंग सुका—अशी कितीतरी वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिचित्रे इथे आपल्याला दिसतात. यांतली प्रत्येक व्यक्ती सर्वसामान्य असूनही तिच्या अंगी वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपण आहे. हे वेगळेपण या कथांनी टिपले आहे. साकारून मांडले आहे. आता कथेतील घटनांमुळे ही माणसे अशी वैशिष्ट्यपूर्ण बनली आहेत, की त्यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपणाने घटनांना तसतसे वळण मिळत गेले आहे, हे सांगणे कठीण आहे. आपल्याला दिसते एवढेच की, घटना रंगत जातात, कथानक उभारले जाते,

नाट्य निर्माण होते आणि ही अशी वैशिष्ट्यपूर्ण माणसे ते नाट्य पेलून धरतात. आपल्या लक्षात राहतात घटना आणि माणसे. जास्त करून माणसेच.

एकंदर ग्रामीण जीवनातले अगदी वेगळे पैलू 'मळणी'तल्या कथांमध्ये आविष्कृत झालेले आहेत. नेहमीची सांकेतिकता अथवा परंपरेने आलेले विषय सोडून काही कथांमध्ये लेखकाने अगदी निराळ्या विषयाला हात घातला आहे; आणि अतिशय समर्थपणे तो विषय हाताळला आहे. सूक्ष्म मानसशास्त्रीय विचारपद्धती आणि जाणते निरीक्षण यांचे हे सामर्थ्य आहे. उदाहरणार्थ, 'भेग' या कथेमध्ये क्षीणबल झालेला पती व त्याची उफाड्याची पत्नी यांची जीवनसमस्या अत्यंत कुशलतेने व्यक्त झालेली आहे. स्पष्टपणे कुठेही विषयाकडे बोट न दाखवता कथेने अतिशय परिणामकारक स्वरूपात आशयाला आकार दिलेला आहे. त्यामुळे कथेला प्राप्त झालेले प्रतीकात्मक मानस-परिमाण अत्यंत उच्च दर्जाचे आहे. नागमोडी आकारात चमकून जाणाऱ्या, पण दृष्टिपटलावर बराच काळ ठसा उमटविणाऱ्या विजेच्या रेघेसारखे या तरल समस्येचे आलेखन कथेमध्ये झालेले आहे. 'खेळ' ही कथा याच प्रकारची आहे. नवरा परागंदा झाल्यामुळे झुरणारी व शरीराची आग सोसवेनाशी झालेली गुजाबाय. तिचे मन रमवण्यासाठी सोनाक्काचा शाळकरी पोरगा तिच्याशी खेळू लागतो नि खेळात गुजाबाई हरवते. स्थळकाळ विसरते. तिच्या मनाचा झोका भलतीकडेच उंच चढतो आणि अपेक्षाभंग झाल्यावर तिला प्रक्षोभाचा झटका येतो. मानसिक विकृतीच्या या तीव्र भडकपणाचे चित्रणसुद्धा लेखकाने स्वभावाच्या, कृतीच्या नि भाषेच्या बारकाव्यांनी रेखीव केलेले आहे. 'मांडव' कथेतला यशवंता नवविधवा पद्मिनीकडे आशेने जातो. पुनर्विवाहाचा विषय कसा काढायचा त्याला कळत नाही. त्यासाठी मांडवाच्या वाशांचे निमित्त. पण कथेतल्या हळुवार संभाषणात तेच एक प्रतीक होऊन बसते आणि अवघड गुंतागुंत सुलभतेने उकलीत राहते.

**"ती आत गेली. चहा घेऊन परत आली. यशवंतानं चहा घेतला. कपबशी खाली ठेवीत म्हणाला, "बरं, म्या चाललो."**

**ती अर्थपूर्ण नजरेनं त्याच्याकडे पाहत म्हणाली,**

**"आता वाश्याचं कसं करताव ?"**

**"बगावं लागतेल कुठंतरी. वेल चढवायचा नव्ह का ?"**

**"तर वं. वेल चढवायचा म्हंजी मांडव घालायलाच पायजी की." तिचा निरोप घेऊन चालला. वासे कुठं मिळतील या काळजीत तो चालू लागला."**

यासारखे कथेच्या शेवटचे साधे वर्णन मग फार अर्थपूर्ण होते. वासे, मांडव वगैरेंना गडद प्रतीकार्थ प्राप्त होतात आणि आशयाचे ठळक अधोरेखन करतात.

या कथांतली संभाषणे ही एक मला विशेष उल्लेखनीय गोष्ट वाटते. बोलणाऱ्याच्या तोंडून जे शब्द येतात ते जणू अगदी मनाच्या गाभ्यातून तरंगून वर

# यानंतर मला पुन्हा मूल केव्हा व्हावे

बालकाच्या विकासाच्या दृष्टीने त्याच्या जीवनातील पहिल्या चार-पांच वर्षांचा काळ फार महत्त्वाचा असतो असं डॉक्टर्स सांगतात. मातेच्या आरोग्याच्या दृष्टीनेही, पहिल्या अपत्याच्या पाठीवर तिला निदान तीन-चार वर्षांनंतरच पुन्हा मूल होणे इष्ट असते. संतती नियमनाच्या अनेक साध्या सुरक्षित व परिणामकारी पद्धती आजमितीस उपलब्ध आहेत. आता अपत्यजन्म ही योगायोगाची अथवा नशिबाची गोष्ट राहिलेली नाही. पाहिजे तेव्हाच आपणांस अपत्य होऊ देणे आता तुमच्या हातचे आहे.

मोफत सल्ला व सहाय यांच्यासाठी जवळच्या कुटुंब-नियोजन केंद्रात विचारणा करा-




येतात. मनातल्या अस्फुटशाही भावनेचे ते ताजे, विकाररहित आणि स्पष्ट चित्र असते. 'लागेबांधे'मधले तात्याबा इराप्पाशी बोलताना आपल्या मनीचा सल अगदी मोजक्या पण भावनेचे गडद पाणी दिलेल्या शब्दांनी व्यक्त करतात, भावजयीसाठी पोराजवळ निरोप सांगताना ते विनाकारणच गडबडून जातात आणि पोराने भावजयीचे नाव काढल्यावर घाईने बोलणे आटोपते घेतात. तात्याबांनी उरात सोसलेली दुःखाची कळ, अपवादामुळे त्यांच्या मनाची झालेली व्याकुळलेली स्थिती आणि भावजयीला आपले दुःख कळू नये म्हणून चाललेली त्यांची भाबडी धडपड हे सारे त्यांच्या सहज बोलण्यातून पारदर्शकपणे दिसून जाते. आपोआप व्यक्त होते. 'बांध' या कथेच्या अलवार चित्रातील गहिरे रंग त्यातल्या संभाषणांनीच भरलेले आहेत. व्याह्याव्याह्यांच्या तंटयाबखेडयांत विरही झालेले नव्हाळीचे प्रेमी जोडपे येथे संभाषणांतून आपले अबोलीचे दुःख साकारून जाते. हे सर्वत्रच.

'लगीन'सारखी एखादी कथा तर माणसाच्या स्वभावाचे आणि अनुषंगिक कृतींचे कितीतरी मार्मिक बारकावे सादर करते. गळयात दाढी येऊ पाहणाऱ्या पोराचे मोठ्या मिनतवारीने लग्न ठरते, हुंड्याच्या रकमेपासून तो व्याह्यांच्या गाड्यांपर्यंत सगळ्या गोष्टींत बनवेगिरी, भांडणे होतात आणि शेवटी शेंबड्या पोरीशी जाणत्या पोराचे लग्न लागते. या कथानुषंगाने कितीतरी भेदक बारकावे आलेले आहेत. आणि सगळ्यांतच एक गमतीशीर उपहासगर्भता भरून राहिलेली आहे. कुठल्यातरी पातळीवर सगळ्या घटनांच्या गुंताड्याची, त्यातल्या व्यक्तींच्या रागलोभांची संथ निर्विकार चेष्टा चाललेली आहे, असे वाटत राहते.

'मळणी' आणि 'नेट' या कथांमध्ये घटना घडत नाहीत फारशा. एकेकच घटना त्यातील व्यक्तींच्या मनातली आंदोलने सूक्ष्मपणे व्यक्त करते. 'आबाळ', 'पाझर' या कथांमध्ये ही घटना विशेष तीव्र असते. परिस्थितीच्या टोकावरची असते. तिथेही आंदोलने अधिक स्पष्टपणे जाणवतात, दिसतात. 'कोरडी' या कथेत ही आंदोलने बुलंद बेहोषीच्या उन्मुक्त वर्णनात उचंबळतात, तर 'उंबरठा' या कथेत त्यांना पूर्वस्मृतींच्या जखडलेल्या अधिष्ठानामुळे अतिशय विलक्षण स्वरूप प्राप्त होते.

अनेक स्तरांतल्या, अनेक प्रकारच्या व्यक्तींच्या विविध भावावस्था या कथांमधून लेखकाने यशस्वीपणे मांडलेल्या आहेत. ग्रामीण मातीच्या परंपरेशी या भावावस्था जीवनाच्या धाग्याने संलग्न आहेत. हा जीवनाचा धागा स्पष्टतेने रेखण्यात लेखकाचे यश आहे. ग्रामीण परिसर, ग्रामीण व्यक्ती आणि ग्रामीण जीवन या तिन्हींचा सुसंवाद येथे घडून आला आहे. म्हणूनच या कथा वस्तुनिष्ठ असल्या, कथनात्मक असल्या, तरी त्या जिवंत आणि कसदार झालेल्या आहेत.

**[ 'मळणी' – रा. रं. बोराडे – किंमत सहा रुपये – मौज प्रकाशन – पृष्ठे १७९ ]**

लेखक

ब्रिगेडियर जे. पी. दळवी

अनुवाद

ॲडव्होकेट माधव कानिटकर

लेखांक । । । । । । । सहावा

सरसेनापती जनरल थिमय्या यांनी आपल्या सेनापतिपदाचा राजीनामा पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना सादर केला. त्यामागे त्यांचा हेतू हा होता की, ' मेननचं आणि माझं जमायचं नाही. एक तर संरक्षणमंत्री म्हणून मेनन तरी राहतील किंवा सेनापती म्हणून मी तरी राहीन. कुठल्याही परिस्थितीत इथून पुढं आम्ही दोघं आपापल्या पदांना चिकटून राहणं म्हणजे देशाचं अकल्याण करण्यासारखंच आहे. ' जनरल थिमय्या यांचा राजीनामा आणि त्यांनी राजीनाम्यात दिलेली कारणे वाचून पंतप्रधान जवाहरलाल नेहरू भलतेच पेचात आले; कारण त्यांना व्ही. के. कृष्णमेननही हवे होते आणि जनरल थिमय्याही हवे होते. शिवाय पंतप्रधान या नात्याने त्यांना हेही ठाऊक होते की, जनरल थिमय्या यांच्या राजीनाम्याची चर्चा केवळ भारतातच नव्हे, तर परदेशांतदेखील होईल. पण किती झाले तरी पंतप्रधान नेहरू एक सराईत मुरब्बी राजकारणी होते. एखाद्या असा-

# झुंड

मान्य सुंदर स्त्रीला आपल्या 'परिणामकारक' अनुपम सौंदर्याची जाणीव असावी तशी पंतप्रधान पंडित नेहरूंना त्यांच्या प्रभावी, राजकारणी पुरुषी व्यक्तिमत्त्वाची जाणीव होती. असे कित्येक किचकट अंतर्गत प्रश्न त्यांनी 'नेहरू' या एका शब्दावर सोडवले होते. काँग्रेसची बडीबडी धेंडे आपसात भांडत होती, भांडणे 'काँग्रेस सोडण्या'ची भाषा करण्याच्या थराला जात होती, पण 'नेहरू आले' की, सगळे काही पुन्हा ठीक.

पंतप्रधान पंडित नेहरू यांनी जनरल थिमय्यांच्या राजीनाम्याच्या बाबतीत त्यांच्या ह्या खास, राखीव तंत्राचा अवलंब केला. पंतप्रधान नेहरूंनी ताबडतोब स्वत: जनरल थिमय्यांची भेट घेतली आणि राजीनामा मागे घेण्याबाबत जनरल थिमय्यांचे मन वळविण्यात ते यशस्वी झाले. पंडित नेहरूंचे मंत्रमुग्ध करून टाकणारे मोहक व्यक्तिमत्त्व आणि पंतप्रधान हा त्यांचा फार मोठा अधिकार, याचा परिणाम जनरल थिमय्यांसारख्या निष्कपटी आणि सरळसोट 'सोलजर'वरदेखील झाला. जनरल थिमय्यांनी सेनापतिपदाचा राजीनामा मागे घेतला. कारण, पंतप्रधान पंडित नेहरूंनी स्वत: जनरल थिमय्यांना वचन दिले की, तुम्ही ज्या काही सूचना आत्तापर्यंत सरकारला केलेल्या असतील त्यांत मी स्वत: लक्ष घालीन आणि संरक्षणमंत्री श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांनाही जे काही योग्य असेल ते सांगेन.

......पण अखेर जवाहरलाल नेहरू 'नेहरू' ठरले. जनरल थिमय्यांनी त्यांचा राजीनामा परत घेतल्यानंतर एका जाहीर सभेत भाषण करताना त्यांनी जनरल थिमय्यांचीच खरडपट्टी काढली आणि संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांची अफाट स्तुती केली. पंतप्रधान त्या सभेत म्हणाले, "जनरल थिमय्यांनी उगाचच राईचा पर्वत केला. क्षुल्लक कारणांवरून (!) राजीनामा दिला होता त्यांनी. मी स्वत: सांगतो की, व्ही. के. कृष्णमेनन हे १०० टक्के राष्ट्रवादी आहेत. त्यांना कम्युनिस्ट

म्हणणं म्हणजे मला कम्युनिस्ट म्हणण्यासारखं आहे. मलादेखील असं म्हणता यईल की, भारताला चीनकडून धोका असताना ऐनवेळी सेनापतींनी राजीनामा देणं याचा अर्थ लढाईतून आयत्या वेळी पळून जाणं असाच आहे. "

जनरल थिमय्या यांच्यासारख्या थोर सेनापतीची ही पंतप्रधानकृत निंदा ऐकून भारतीय सेनेतले 'जवान'च नव्हेत तर मोठमोठे लष्करी अधिकारी दु:खी झाले. त्याला कारणे दोन होती. एक तर भारतीय लष्करातल्या प्रत्येक जवानाची जनरल थिमय्यांवर अलोट श्रद्धा आणि प्रेम होते. जनरल थिमय्या या लढवय्या, पराक्रमी सेनापतीने आत्तापर्यंत अक्षरश: जिवावर उदार होऊन अनेक लढाया मारल्या होत्या, असा मनुष्य 'लढाईतून पळून' जाण्यासाठी राजीनामा देईल? काय बोलता! अरे! संरक्षणमंत्र्यांशी मतभेद झाला म्हणून सेनापती राजीनामा देतो याचा अर्थ संरक्षण (!) मंत्र्यांची तावडतोब हकालपट्टी करा असा होता. पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंसारख्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या माणसाला हे कळले नाही, असे म्हणू, की मेननच्या आहारी जाऊन काहीही करून व्ही. के. कृष्णमेननचे समर्थन करायचेच, असे ठरवल्यामुळे पंतप्रधान मुद्दाम वेड पांघरून पेडगावला गेले असे म्हणू? भारतीय लष्कर या भाषणामुळे अस्वस्थ व्हावे याला दुसरे कारण म्हणजे याच जाहीर सभेत पंतप्रधान नेहरू म्हणाले, "लोकनियुक्त प्रतिनिधीला एखादी विशिष्ट गोष्ट करायला भाग पाडण्याची ही लष्करी अधिकाऱ्यांची वृत्ती चांगली नाही. त्याबद्दल मी तीव्र नापसंती व्यक्त करतो; कारण या देशात लोकशाही आहे, हुकूमशाही नाही. लोकशाही मानणाऱ्या देशांत लोकांनी निवडून दिलेल्या व्यक्तींचा अधिकारच सर्वोच्च अधिकार असला पाहिजे." (टाळ्या!!!)

जनरल थिमय्यांना कुठून राजीनामा परत घेतला आणि फसलो असे झाले असेल. पंडित नेहरूंचा मेनन–थिमय्या वादात प्रचंड विजय झाला. मेननही राहिले आणि जनरल थिमय्याही राहिले. पुन्हा नेहरू आणि मेनन 'लोकनियुक्त प्रतिनिधी' असल्यामुळे जनरल थिमय्यांवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या बोलू शकत होते, तर जनरल थिमय्या यांना हात चोळीत बसावे लागले होते. निंदा सहन करावी लागत होती. कारण, सेनापती या नात्याने 'प्रचंड जाहीर सभा' घेण्याचा अधिकार त्यांना नव्हता. या देशात लोकशाही आहे ना? पण सत्य हे अखेर सत्य ठरतेच. पंडित नेहरूंना त्यांच्या हयातीतच संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांना संरक्षणमंत्रिपदावरून दूर करावे लागले आणि नेफामध्ये भारतीय सैन्याला माघार घ्यावी लागते हे पाहिल्याबरोबर जनरल थिमय्या यांना सन्मानाने परत बोलावून त्यांची नॅशनल डिफेन्स कौन्सिलवर नेमणूक करावी लागली.

याच संदर्भात एक गोष्ट मी विसरू शकत नाही. ती अशी की, भारत-चीन यांच्या सरहद्दीच्या तंट्याचे भांडवल करून पंतप्रधान पंडित नेहरूंनी जनरल थिमय्या यांना नामोहरम करण्यासाठी त्या तथाकथित संभाव्य लढाईचा उपयोग करून

घेतला. त्याचप्रमाणे याच ' भांडवला 'च्या जोरावर लोकसभेची नाराजी ओढवून घेऊन जनतेवर कर लादले. भारत आणि चीन यांच्यांत लढाई होण्याची शक्यता म्हणून जर का करवाढीचे समर्थन पंतप्रधान करीत होते तर त्यांनी करवाढ झाल्यानंतरदेखील देशाच्या संरक्षणाकडे दुर्लक्ष का केले ? एवढेच नव्हे तर, या करवाढीनंतरदेखील लोकसभेत आणि जाहीरसभांतून ' चीनला युद्ध नको आहे, चीन भारतावर आक्रमण करणे शक्य नाही, ' या अर्थाची भाषणे पंतप्रधान का करीत होते ? या दोन्ही परस्परविरुद्ध विचारांचा मेळ घालायचा तरी कसा ? एक राजकारणी पुरुष म्हणून पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास केला तर असा भरपूर पुरावा मिळतो की, जो पाहून प्रत्येक भारतीयाला असह्य मानसिक दुःखाने असे म्हणावे लागेल की, आमचे पंतप्रधान खऱ्या अर्थाने राजकारणी पुरुष नव्हतेच. कारण, राजकारणी पुरुष हा नेहमीच धोका होईल हे धरून चालून ' सर्व विषयी सावध ' असतो तर प्रत्यक्ष धोका पोचेपर्यंत बेसावध राहण्याइतके पंडितजी हळव्या मनाचे होते. परिणामी सरकारच्या चीनबाबतच्या धोरणामुळे मेनन आणि जनरल थिमय्या या दोघांचा ऱ्हास झाला. पंतप्रधान नेहरू दोघांनाही सांभाळून घ्यायला गेले आणि कुणालाच सांभाळू शकले नाहीत. राजकारणात दोन मोठ्या माणसांत भांडण जुंपते, तेव्हा त्या दोघांपैकी कुणाला तरी एकाला अक्षरशः ' उडवावा ' लागतो आणि कुणाला उडवायचा ते विचार करून योग्य वेळीच ते काम करावे लागते. जनरल थिमय्या यांचा राजीनामा आल्याबरोबर लगेच पंतप्रधानांनी व्ही. के. कृष्णमेनन यांना संरक्षणमंत्रिपदावरून दूर केले असते तर त्यांना पुढे पश्चात्ताप करण्याची पाळी आली नसती. कारण, जनरल थिमय्या हा अनुभवी, शिस्तप्रिय, निष्कपटी शिपाई गडी होता. राष्ट्रवाद आणि राष्ट्रभक्ती त्यांना कुणी शिकवायची आवश्यकता नव्हती. 'क्षुल्लक' गोष्टींचे भांडवल करून आततायी निर्णय घेण्याइतका तो माणूस ' सामान्य ' नव्हता. देशाचे हित हे त्यांच्या जीवनाचे ब्रीदवाक्य होते. आणि ज्या वेळी त्यांची अशी खात्री पटली की, व्ही. के. कृष्णमेनन हे जोपर्यंत संरक्षणमंत्रिपदावर आहेत तोपर्यंत देशाचे भवितव्य कठीण आहे; एवढेच नव्हे तर मेननमुळे सैन्याची बिघडत चाललेली शिस्त—वाट्टेल त्या माणसाला प्रमोशन, आणि लष्कराच्या लहानसहान व्यवहारात मेनन यांचा हस्तक्षेप—यांमुळे जनरल थिमय्या यांच्या मनाला यातना झाल्या आणि या सगळ्या प्रकारांकडे पंतप्रधान पंडित नेहरूंचे लक्ष वेधले जावे म्हणून नाइलाजास्तव त्यांनी सेनापतिपदाचा राजीनामा दिला होता. एक शिस्तबद्ध, कर्तव्यतत्पर सेनापती म्हणूनच त्यांनी पंतप्रधान नेहरूंचा मान राखून राजीनामा परत घेतला होता. जर का जनरल थिमय्या हा लहानसहान गोष्टींनी चिडून जाऊन त्यांचे भांडवल करणारा, संयम सोडणारा अविवेकी होता तर पंतप्रधान नेहरूंनी ' आर्मी चीफ ' या सन्माननीय पदावर त्यांची नेमणूक केलीच कशी ? मी असे म्हणतो, याला कारण, जनरल थिमय्या यांची सेनापतिपदावर नियुक्ती

करण्याचे श्रेय फक्त पंतप्रधान नेहरूंनाच आहे म्हणून जनरल थिमय्या यांच्या आर्मी चीफ म्हणून केल्या जाणाऱ्या नियुक्तीचा अट्टाहास धरला होता तो पंतप्रधान नेहरूंनीच. जनरल थिमय्या यांनी सेनापतिपद स्वीकारल्यानंतर वेळोवेळी पंतप्रधान पंडित नेहरूंना चीनच्या बाबतीत गंभीर इशारे दिले होते. चीनचा हेतू संशयास्पद आहे, चीनवर विश्वास ठेवू नका, हे पंतप्रधानांना त्यांच्या तोंडावर स्पष्टपणे सांगणारा एकमेव माणूस म्हणजे जनरल थिमय्या. जून १९६० मध्ये जनरल थिमय्या म्हणाले, "आत्तापर्यंत हाती मिळालेल्या माहितीवरून असं दिसतं की, भारताच्या सरहद्दीला लागूनच चिन्यांनी सैन्याची प्रचंड जमवाजमव केलेली आहे. आणि मी ह्या चिंतेत पडलो आहे की, इतकं प्रचंड सैन्य भारतीय सरहद्दीच्या जवळ चिन्यांनी का बरं आणून ठेवावं ? त्यांचा हेतू काहीतरी वेगळा दिसतोय. जर का चीनच्या मना भारताशी युद्ध सुरू करायचं नसेल तर मग ही जमवाजमव कशासाठी ? चीन नक्की भारतावर आक्रमण करील. आणि अशी लढाई सुरू झालीच तर प्रत्यक्ष चिन्यांशी लढण्यापूर्वी आपल्याला अनेक विकट नैसर्गिक आपत्तींबरोबर सामना द्यावा लागेल चीननं फार पूर्वीपासूनच जी 'व्यवस्था' करून ठेवली आहे, तिचा फायदा त्यांना नक्कीच मिळेल."

जनरल थिमय्यांनी इतक्या स्पष्ट भाषेत इशारा देऊनदेखील भारत सरकारने तिकडे दुर्लक्ष केले. भारत सरकारच्या मते चीनने तिबेटमध्ये प्रचंड सैन्याची जमवाजमव करणे यात अनिष्ट असे काहीच नव्हते. आणले असेल चिन्यांनी प्रचंड सैन्य. पण ते तिबेटमध्येच ना ! मग आपल्याला सध्या काळजी करण्याची काय जरूर ? तिबेटमध्ये कायदा आणि सुव्यवस्था यांचे संरक्षण करण्यासाठी आणि बंडखोर खंपांचा बंदोबस्त करण्यासाठीच चिन्यांनी तिबेटमध्ये सैन्याची जमवाजमव केली असली पाहिजे, ही भारत सरकारची विचारसरणी होती. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या चरित्र लेखकाची लेखणी अनेक वेळा त्याला अडचणीत आणील. कारण, सबंध देशाचे संरक्षण धोक्यात आणून फक्त मित्र म्हणून व्ही. के. कृष्णमेनन यांचा बचाव करण्याच्या पातळीवर नेहरू घसरले या मागे काय गूढ होते ते चरित्र–लेखकाला उकलून दाखवता येणार नाही. कारण, तसे बघायला गेले तर क्षुद्र मनोवृत्ती आणि व्यक्तिगत स्वार्थ यांपासून पंतप्रधान अलिप्त होते आणि कुठलाही भारतीय स्वप्नात-देखील नेहरू राष्ट्रद्रोही होते, असा आरोप करणे शक्य नाही, इतकी त्यांची या देशावर भक्ती होती. मग हे असे का घडले ? पंतप्रधान नेहरूंनी जनरल थिमय्यां-पेक्षा व्ही. के. कृष्णमेनननाच जवळचे का मानले ? का एकटे पडले जनरल थिमय्या ?

जनरल थिमय्या हे अत्यंत कार्यक्षम होते. त्याचबरोबर आपल्या हाताखालच्या लोकांची मने सहज जिंकणारे, त्यांचे प्रेम मिळवणारे होते. त्यांचा दरारा होता पण त्यांची भीती वाटत नसे. भारतीय जवान तर जनरल थिमय्यांना प्रेमाने 'टिमी

म्हणत असत. उलट 'थिमय्यां' पेक्षा त्यांचे 'टिमी' हे लाडके नावच जवानांना अधिक प्रिय होते–अधिक प्रसिद्ध होते. असे सहसा घडत नाही. शिस्त राखून दरारा उत्पन्न करणे, पण त्याचबरोबर हाताखालच्या लोकांचे प्रेम मिळविणे या दोन्ही गोष्टी एकाच माणसाला सहसा जमत नाहीत. एखादा 'ऑफीसर' इतका कडक वागतो की त्याच्या हाताखालची माणसे त्याच्या मागे त्याला शिव्याच घालतात तर काही ऑफीसर्स इतके प्रेमळ आणि मनमिळाऊ (!) असतात की, त्यांचा पट्टेवाला-देखील त्यांना जुमानीत नाही. जनरल थिमय्या या दोन्ही गोष्टींना अपवाद होते. भारतीय सेनेला जनरल थिमय्यांसारखा प्रमुख फील्ड कमांडर दुसरा क्वचितच मिळाला असावा. दुसऱ्या महायुद्धात आराकानमध्ये जनरल थिमय्या एका ब्रिगेडचे नेतृत्व करीत होते. ब्रिटिशांच्या बाजूने प्रत्यक्ष रणांगणावर जाऊन नेतृत्व करणारे ते पहिले आणि एकमेव कमांडर होते. ब्रिटिश सरकारने त्या वेळच्या त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना 'ब्रिटिश डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस ऑर्डर' हा मानाचा किताब दिला. भारतात वेगवेगळे प्रांत आहेत. प्रत्येकाला थोडाबहुत-प्रांताभिमान असतोच. असे असूनसुद्धा पंजाबी, बंगाली, मराठी, मद्रासी, उत्तर हिंदुस्थानी अशा विविध प्रांतांतल्या जवानांचे अलोट प्रेम जनरल थिमय्यांनी मिळवले होते हे विशेष. जवान, मग तो कुठल्याही प्रांतातला असो, जनरल थिमय्या त्याला 'आपले' वाटत असत.

हिंदुस्थानची फाळणी झाली त्या वेळी पंजाब बाऊंडरी फोर्सचे ते कमांडर होते. फाळणीनंतरचे ते दिवस. धर्मवेडाच्या आहारी गेल्यामुळे खून, जाळपोळ, लुटालूट, बलात्कार, विटंबना आणि सर्रास कत्तली यांना नुसता ऊत आला होता. नुसती दृश्ये पाहिली तरी सामान्य माणसांची डोकी फिरत असत. एका मुसलमानाने एका हिंदूला भोसकून ठार मारले, हे नुसते बघायची खोटी की, हातात मिळेल तो मुसलमान खलास! मारला कुणी कुणाला आणि मेला कोण! वेड लागायची पाळी आली. पण तशाही अवस्थेत डोके शांत ठेवून, हा हिंदू,हा मुसलमान, असा भेद न करता अत्यंत आस्थेवाईकपणाने आणि प्रामाणिकपणाने काम करून जनरल थिमय्यांनी मी केवळ माणसे मारण्यातच नव्हे तर माणसे वाचवण्याच्या क्षेत्रात–सर्व क्षेत्रांत–मोठा आहे हे सिद्ध करून दिले. जनरल थिमय्यांनी त्या वेळी अनेक मुसलमानांना वाचवले पण त्याचबरोबर १९४८ मध्ये 'काश्मीर मुक्त' करण्यासाठी कमांडर म्हणून रवाना झाले. आणि तिथेही त्यांनी यश मिळवले. काश्मीरचे खोरे त्यांनी हां हां म्हणता शत्रूच्या हातातून हिसकावून घेतले. कोण होते शत्रूपक्षात? फक्त मुसलमान. जनरल थिमय्या हे असे विचारी, विवेकी आणि समतोल होते. जनरल थिमय्यांचा त्याच वेळी असा आग्रह होता की, आता निमित्त मिळालेच आहे तर ठोकून काढा पाकिस्तानला आणि सबंध काश्मीर ताब्यात घ्या. तसे झाले असते तर 'पाकव्याप्त काश्मीर' हा शब्ददेखील आत्ताच्या तरुण पिढीला ऐकायला मिळाला नसता. पण दुर्दैव या देशाचे! काय कारणे होती

तो फक्त भगवंताला आणि पंतप्रधान पंडित नेहरूंनाच ठाऊक. युद्ध ऐन रंगात आलेले असताना, काश्मीर आपल्या ताब्यात ३ आलेला असतानाच, मध्येच पंडित जवाहर-लाल नेहरूंनी हुकूम दिला की, "युद्ध बंद करा!"


जनरल थिमय्यांची योग्यता ही अशी फक्त मुलूखमैदानी नव्हती. शांततेच्या काळातदेखील आर्मी कमांडर आणि आर्मी हेड क्वार्टर्समध्ये प्रिन्सिपल स्टाफ ऑफीसर म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी बजावली होती. जनरल थिमय्यांची लष्करी कारकीर्द आणि पार्श्वभूमी ही अशी निष्पाप आणि निर्दोष होती. शिवाय राजकीय नेत्यांची आज्ञा म्हणून जनरल थिमय्यांनी अशी अनेक पदे भूषवली होती की, ज्यांचा लष्कर आणि लढाई यांच्याशी दूरान्वयानेदेखील संबंध नव्हता आणि तिथेदेखील ते यशस्वी ठरले होते.

विशेष व्यक्ती म्हणून माणसाच्या ठिकाणी आवश्यक असणारे गुण आणि लष्करी अधिकाऱ्याला आवश्यक असणारी बुद्धिमत्ता आणि अनुभव यांचा सुरेख संगम म्हणजे जनरल थिमय्या. कमांडर थिमय्या म्हणजे एक जादूच होती. केवळ ऑफीसर्सच नव्हेत तर साधा शिपाईदेखील जनरल थिमय्यांबद्दल आदरयुक्त प्रेमा-नेच बोलणार हे ठरलेले. मी स्वतः भारतीय सेनेत २५ वर्षांहून जास्त काळ 'नोकरी' केलेली आहे. पण या प्रदीर्घ कालखंडात एकाही भारतीय जवानाला जनरल थिमय्यांबद्दल कडवट बोलताना मी एकदाही ऐकलेले नाही किंवा 'जनरल थिमय्या यांनी अमूक एक निर्णय घेतलेला आहे तो चुकीचा आहे,' असे 'लढाई' या विषयात तज्ज्ञ असलेला एकही लष्करी अधिकारी म्हणाला नाही. याला म्हण-तात जनरल. याला म्हणतात अजातशत्रू व्यक्तिमत्त्व. कुठल्याही उमद्या शूराला—सैनिकाला—यापेक्षा जास्त मोठ्या प्रशंसेची अपेक्षा नसते. मोठमोठ्या पदव्या आणि किताब मिळवणाऱ्या पराक्रमी माणसांबद्दल फारसे चांगले बोलले जातेच असे नाही. पण 'तो माणूस अतिशय विचारी, कार्यतत्पर आणि सभ्य आहे!' एवढे एकच सर्टिफिकेट—एका ओळीचे सर्टिफिकेट—तुम्हांला मिळवायचे असेल तर 'आदर्श' म्हणून तुम्हांला जनरल थिमय्यांचेच उदाहरण डोळ्यांपुढे ठेवावे लागेल. कारण, हे प्रशस्तिपत्रक कुठलीही युनिव्हर्सिटी देऊ शकत नाही तर तुमच्या सहवासातले लोक देत असतात.

जनरल थिमय्या यांनी १९५३–५४ मध्ये जी उत्तम कामगिरी कोरियामध्ये बजावली, त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभली. पंतप्रधान पंडित जवाहर-लाल नेहरूंवर भारतीय जनतेचे अपार प्रेम होते. अशा नेहरूंची उघड उघड निर्भ-र्त्सना करून, त्यांचा कट्टर विरोधक म्हणून प्रसिद्धी मिळवूनदेखील, भारतीय जन-तेचेदेखील प्रेम आणि आदर मिळवणारी सरदार पटेलांसारखी जी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच माणसे या देशात होऊन गेली, त्यांची मोजदाद करताना एक बोट तुम्हांला जनरल थिमय्या यांच्या नावाने मोडावे लागेल. जनरल थिमय्या

हे व्यक्तिमत्त्व असे नव्हते की जे नेहरूंनी सहज धुडकावून द्यावे. इतर अनेक 'लाळघोटया' लष्करी अधिकाऱ्यांसारखे जनरल थिमय्या पंतप्रधान नेहरूंच्या पुढे पुढे करीत नसत. युद्धशास्त्रातले त्यांचे ज्ञान आणि अनुभव इतका मोठा आणि महत्त्वाचा होता की, त्यांनी चीनबाबत वेळोवेळी दिलेल्या गंभीर इशाऱ्यांकडे दुर्लक्ष व्हायला नको होते. 'आर्मी चीफ' म्हणून नेमणूक झाल्यानंतर मार्च १९५७ मध्ये 'टाईम्स ऑफ इंडिया' या प्रमुख इंग्रजी वृत्तपत्राने त्यांच्यासंबंधी एक खास गौरव करणारा अग्रलेख लिहिला. आपल्या अग्रलेखात या प्रमुख इंग्रजी वृत्तपत्राच्या संपादकाने म्हटले आहे. " भारतीय सेनेतल्या जवानांच्या उत्साहाला उधाण आलेले आहे. प्रत्येक जवानाच्या अंगावर आनंदाने रोमांच उभे राहिले आहेत. कारण, त्यांना हे समजले आहे की, त्यांचा 'टिमी' आता सेनापती झाला ! " भारतीय सेना याच दिवसाची वाट पाहत होती की केव्हा एकदा आपला 'टिमी' 'आर्मी चीफ' होईल. कारण भारतीय सेनेला हे ठाऊक होते की, या सगळया सावळया गोंधळात जनरल थिमय्या हा एकमेव जनरल असा आहे की कोणाचीही पर्वा न करता केवळ देशाचे हित नजरेपुढे ठेवून योग्य वेळी योग्य ती हालचाल केल्याशिवाय राहणार नाही.

मला सांगायला अभिमान वाटतो की, अशा या थोर जनरल थिमय्यांचा अत्यंत निकटचा सहवास मला लाभला. त्यांच्यापासून मी खूप शिकलो. लढाईत सैन्याची रचना कुठल्या वेळी कशी करायची, जवानांचे संघटन म्हणजे काय, सैन्याची हालचाल एकदम करायची की युक्तीने, हे सर्व मी मिलिटरी ऑपरेशन्स डिरेक्टरेटमध्ये जनरल थिमय्यांच्या हाताखाली शिकलो. 'आर्मी चीफ' होण्यापूर्वी भारतीय सेनेत जी बेदिली आणि बेशिस्त माजली होती ती नाहीशी करून टाकण्यासाठी या माणसाने किती कष्ट घेतले ते मी जवळून पाहिले आहे. पुन्हा उत्साह कायम. पुढे पुढे मात्र त्यांचा हा उत्साह झिजत गेला. कारण, संरक्षण खात्यातले अधिकारी—





**जून १९६० । जनरल थिमय्या । ब्रिगेडियर दळवी**
**डेहराडून येथे मिलिट्री अ‍ॅकेडेमीची मानवंदना स्वीकारताना**

जे संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेननच्या हाताखाली होते ते त्यांना] प्रत्येक लहान सहान बाबतीत मनःस्ताप देऊ लागले. जनरल थिमय्या यांच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले गेले. भारतीय सेनेची ताकद वाढविण्याच्या बाबतीत आपल्याच संरक्षण खात्याने त्यांचा भ्रमनिरास केलेला. मनाच्या अत्यंत विकल अवस्थेत जनरल थिमय्या सेवानिवृत्त (Retired) झाले. त्या वेळीदेखील भारतीय सेनेची अवस्था चीनबरोबर लढाई झाली तर आपली दुर्दशा होईल, अशीच होती; कारण, जनरल थिमय्यांच्या मागण्यांपैकी एकही मागणी भारत सरकारने पूर्ण केली नव्हती. सेवानिवृत्त होण्याच्या जरा अगोदर जनरल थिमय्यांना 'निरोप' देण्याचा समारंभ झाला. 'आता जनरल थिमय्या जाणार' ही व्यथा अंतःकरणात ठेवून असंख्य जवान त्या निरोप समारंभाला उपस्थित होते. अनेक लढाया मारलेला हा थोर जनरल ! रक्त आणि मृत्यू या दोघांशी जन्माची दोस्ती ! पण भारतीय जवानां-

पुढे निरोप समारंभातले शेवटचे भाषण करीत करीत असताना जनरल थिमय्यांचा कंठ दाटून आला. त्यांना भरून आले आणि त्याच मनःस्थितीत गंभीर आवाजात ते म्हणाले, "मी अशी आशा बाळगतो की, चिन्यांच्या तोफांच्या भडीमारापुढं भक्ष्य म्हणून मी तुम्हांला सोडून जात नाही आहे, याबद्दल तुमची खात्री असेल. परमेश्वर तुमचं रक्षण करो – तुम्हांला सुखी ठेवो. जय हिंद!" जनरल थिमय्या खाली बसले तेव्हा अनेक जवानांनी डोळयांच्या कडा पुसल्या.

सेनापतिपदाचा राजीनामा देणारे जनरल थिमय्या हे असे होते एक शिस्तप्रिय, कार्यतत्पर लष्करी अधिकारी. त्या नात्याने त्यांनी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी दिलेल्या आश्वासनांवर विश्वास ठेवून राजीनामा मागे घेतला होता. लोकशाही राष्ट्रांत लष्कर आणि नियुक्त प्रतिनिधी यांच्यांत जेव्हा जेव्हा मतभेद होतो–मतभेद विकोपाला जातात–त्या त्या वेळी सबंध राष्ट्राचे लक्ष या महत्त्वाच्या प्रश्नाकडे वेधून घेतले जावे, 'निवडून दिलेल्या लोकांना' फेरविचार करण्याची बुद्धी सुचावी म्हणून लष्करी अधिकाऱ्याने राजीनामा देणे एवढा एकच मार्ग मोकळा असतो; कारण, लोकशाही राष्ट्रांत लष्करी अधिकारीदेखील लोकशाही मानतात म्हणून. उलटया काळजाच्या, नको त्या क्षेत्रात महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या, लोकशाहीच्या गप्पा मारणाऱ्या, नालायक राजकारणी मुखंडांपासून देश वाचवायचा असेल तर जनतेला ते सर्व समजावे म्हणून सेनापतीने राजीनामा देणे एवढा एकच मार्ग लोकशाहीमध्ये उरतो. काय चुकले होते जनरल थिमय्यांचे? देश वाचवण्यासाठी लष्करी अधिकारी दुसऱ्या मार्गाने जाऊ शकले असते, पण मग लोकशाही राहिली नसती. 'लोकशाही आहे! लोकशाही आहे!' असा कंठशोष करून टाळचा पिटणाऱ्या लोकांना, आपल्या देशाची फार मोठी पवित्र भूमी याच 'लोकशाही'ने घालवली याची खंत वाटत नाही–दैनंदिन जीवन जगताना याची आठवणदेखील त्यांना राहत नाही, हे आम्हा लष्करी अधिकाऱ्यांचे दुःख तुम्हांला समजेल का? उलट, आम्ही लष्करातली माणसेच खऱ्या अर्थाने लोकशाही मानतो. खऱ्याखोटयाची चाड नसलेली निंदात्मक टीकेची रास भर लोकसभेत पंडित नेहरूंनी जनरल थिमय्यांच्या डोक्यावर ओतली, पण जनरल थिमय्यांनी शांतपणे आणि धैर्याने त्या गदारोळीला तोंड दिले. "मी चुकत नाही, अशी माझी खात्री आहे. तुम्हांला माझी निंदा करायची असली तर करा. ती मी सहन करीन; कारण, कदाचित तुमचे बरोबर असेल. पण लक्षात ठेवा, सत्य हे शेवटी खरे ठरणार' असे जो मानतो तोच लोकशाही मानतो. निवडणुकांचे आखाडे, एकमेकांची बदनामी करणारी भाषणे, जातिपातीवरून वैमनस्य, घोषणा, बॅनर्स, आरडाओरड करणारी माणसे जेव्हा 'लोकशाही' हा शब्द उच्चारतात तेव्हा हसावे का रडावे, ते आम्हा लष्करी अधिकाऱ्यांना कळत नाही. कारण एरव्हीच्या जीवनात ही माणसे 'राष्ट्र' या शब्दाशी दूरान्वयानेदेखील संबंध ठेवत नाहीत. जनरल थिमय्यांसारख्या माण-

साचा 'अस्त' हा असा करुणास्पद झाला. भारताला पुन्हा असा जनरल मिळवायला अनेक वर्षे लागतील आणि तरीदेखील मिळेल की नाही शंकाच आहे. कारण, असा जनरल जन्मालाच यावा लागतो, मिळवता येत नाही.

इथे एक गोष्ट प्रामाणिकपणे कबूल करायला पाहिजे की सेवानिवृत्त होण्यापूर्वी काही काळ जनरल थिमय्या यांचा सैन्यातला दरारा थोडा कमी झाला होता आणि त्याला कारण त्यांनी राजीनामा परत घेतला हेच. जनरल थिमय्या काहीतरी चांगल्या हेतूने करायला गेले आणि दोन्हींकडून कोंडीत सापडले. जनरल थिमय्या यांनी राजीनामा दिला होता म्हणून पंतप्रधान नेहरूंनी आगपाखड केली तर जनरल थिमय्या यांनी राजीनामा मागे घेतला म्हणून वरिष्ठ लष्करी अधिकारी रागावले. त्यांचे मत असे होते की, सैन्याचे आणि देशाचे भले व्हायला हवे असेल तर काहीतरी खळबळजनक जबरदस्त किंवा जहाल व्हायलाच हवे होते. जनरल थिमय्या ! तुझ्या राजीनाम्यामुळे ते घडत होते. पंतप्रधान पंडित नेहरू 'ठिकाणावर' येणार होते. पण नेहरू तुला येऊन भेटले आणि तू विरघळलास. पंडित नेहरूंच्या पुढे पुढे करणारे लाळघोटचे जनरल्स आणि तू दोघेही एकाच माळेचे मणी ! आणि एवढे करून पंतप्रधानांनी तुला चांगलेच म्हटले ? मेननला चमकावला ? केली त्याची हकालपट्टी ? छे: छे: ! उलट नेहरूंनी तुलाच बदनाम केला आणि मेननची पाठराखण केली. जगातल्या प्रत्येक सरळ, निष्कपटी आणि सज्जन माणसांचे हे असे हाल होतात. बिचारे दोन्हींकडून मार खातात. कारण जनरल थिमय्यांचे लष्करी दोस्त त्यांना हा सल्ला देत होते की 'अजून शहाणा हो. अजून वेळ गेलेली नाही. पंडित नेहरूंनी तुला बदनाम केला म्हणून आम्ही तुझे मित्र इतके रागावलो तुला राग कसा येत नाही ? पुन्हा राजीनामा दे आणि पंतप्रधान पंडित नेहरू तुला १०० वेळा भेटायला आले, त्यांनी काहीही आश्वासने दिली तरी कुठल्याही परिस्थितीत राजीनामा परत घेऊ नकोस.

...... जनरल थिमय्या यांना मी विचारी आणि शांत धीरोदात्त पुरुष म्हणतो ते यासाठी की दोन्हींकडून असा मार खाऊनदेखील त्यांनी त्यांच्या मित्राना शांत केले. माझ्या मते त्याचे मुख्य कारण असे होते की जनरल थिमय्यांना हे ठाऊक होते की जगण्यासारखे काहीतरी आहे तोवरच मरण्यात मजा आहे. आपण राजीनामा दिला — नेहरू आले — आपल्याला भेटले — आपण राजीनामा परत घेतला — देशात खळबळ उत्पन्न झाली — पंतप्रधानांचे संरक्षणमंत्री आणि सेनापती यांच्या मतभेदांकडे लक्ष वेधले गेले — आपले काम झाले. माझे स्वतःचे व्यक्तिगत मत मात्र असे आहे की जनरल थिमय्यांनी आपली बदनामी प्रत्यक्ष पंतप्रधान करताहेत आणि तीसुद्धा संरक्षण मंत्र्याला 'वाचवण्या'साठी. हे लक्षात आल्यावरोबर पुन्हा राजीनामा द्यायला हवा होता. कदाचित पंतप्रधान पडित नेहरूंवर त्यामुळे दडपण आले असते. कदाचित मेननचे महत्त्व पतप्रधानांनी कमी असते आणि त्याचा परिणाम

म्हणून ऑक्टोबर १९६२ चा दारुण पराभव टळला असता, की जो पराभव करण्यामागे मुख्यतः चिन्यांपेक्षा मेननचाच फार मोठा वाटा होता. खुद्द काँग्रेसमध्येदेखील मेननला कडवा विरोध करणारे अनेकजण होते. वृत्तपत्रे तर मेननच्या नावाने ठणाणा करीतच होती. या परिस्थितीत जनरल थिमय्यांनी पुन्हा राजीनामा दिला असता तर त्या राजीनाम्याचे निमित्त आणि भांडवल करून जनतेने मेननला नामशेष करून टाकला असता. जनरल थिमय्यांच्या दुसऱ्यांदा दिल्या गेलेल्या राजीनाम्यामुळे पंडित नेहरू पुन्हा एकदा कोंडीत सापडले असते. त्यांच्यापुढे प्रश्न पडला असता की आता कुणाला 'उडवू' ? मेननला की जनरल थिमय्याला ? कदाचित आणि कदाचित त्यांनी मेननलाच उडवला असता. कारण लोकसभेत संरक्षणमंत्री मेनन यांच्याविरुद्ध गदारोळ होत होता. जनमत मेननविरुद्ध प्रक्षुब्ध झाले होते आणि या आगीत वृत्तपत्रांचे संपादक मेननविरोधी कडवट लेख लिहून तेल ओतत होते. जनरल थिमय्यांच्या दुसऱ्यांदा दिल्या जाणाऱ्या राजीनाम्यात मेननला शासन करण्याचे सामर्थ्य होते. शिवाय त्यापासून दुसराही एक फायदा होणार होता. प्रक्षुब्ध जनमतापुढे नमते घेऊन मेननला संरक्षणमंत्रिपदावरून दूर करताना पंतप्रधानांचा 'मी' पणा थोडासा कमी झाला असता. कारण, मेननचा पराभव म्हणजे माझाच पराभव असे खुद्द नेहरूच जाहीर सभांतून सांगत होते. नेहरूंच्या बाजूला ज्या तोंडपुज्या, लोचट मंडळींचे वर्तुळ निर्माण झाले होते ती मंडळी ' नेहरू कधी चुकत नाहीत, नेहरू करतात ते अत्यावश्यक असेल तेच करतात, राष्ट्रापेक्षा नेहरू मोठे आहेत.' असली बाष्कळ बडबड करीत असत, त्यांनाही चपराक बसली असती. त्यांना कळले असते की जनरल थिमय्यांनी पुन्हा राजीनामा दिल्याबरोबर भारतीय जनता खवळून उठते, परिस्थिती ओळखून नेहरू नमते घेतात आणि संरक्षणमंत्री मेनन यांना मंत्रिपदावरून गचांडी देतात ! अरेच्या म्हणजे ! नेहरूंपेक्षा राष्ट्रच मोठे असावे आणि नेहरूदेखील चुकू शकतात तर ! आपण इतके दिवस उगाचच तोंडपाटीलकी केली.

... पण तसे घडले नाही. जनरल थिमय्यांनी पुन्हा राजीनामा दिला नाही. मेनन–थिमय्या वादात मेननचा प्रचंड विजय झाला. जनरल थिमय्यांच्या मार्गदर्शनाकडे दुर्लक्ष केले गेले. आणि राष्ट्रामध्ये जे महाभारत घडत होते त्यातल्या मेनन–थिमय्या या बेचव उपकथानकावर पंडितजींनी यशस्वीरीत्या पडदा टाकला. भारतीय सेनेत आता असा कोणी जनरलच उरला नाही की जो पंतप्रधान पंडित नेहरूंना चीनच्या बाबतीत त्यांनी अवलंबिलेले धोरण बदलायला लावील. आता सगळा 'एकपात्री' प्रयोग सुरू झाला. पंतप्रधान नेहरूंचा एकमेव सल्लागार म्हणजे व्ही. के. कृष्णमेनन. ' मेनन बोले आणि नेहरू हाले ' अशी परिस्थिती निर्माण झाली. पंडित नेहरूंना सल्ला देणाऱ्यांत आता मेननच्या कंपूतले काही निवडक लष्करी अधिकारी सामील झाले–ज्यांना चीनबरोबर लढायचे होते, पण स्वतः जखमी न होता किंवा चिनी बांधवांना (!) जखमी न करता ! या

बुद्धिबळाच्या डावात जी मुळात प्यादी होती ती एकदम वजिरासारखी वागायला लागली.

इतिहास हा नेहमी ' जर–तर ' या शब्दांनी परिपूर्ण भरलेला असतो. महाराष्ट्रात जर शिवाजीमहाराज जन्मालाच आले नसते तर ? दुसरा बाजीराव महापराक्रमी निपजला असता तर ? असे प्रश्न आपल्याला नेहमीच पडतात. कारण, ' जर ' आणि ' तर ' या दोन शब्दांत शेकडो वर्षांचा इतिहास आणि महान ऐतिहासिक व्यक्ती यांची उलथापालथ करून टाकण्याचे सामर्थ्य आहे. जनरल थिमय्या यांनी पुन्हा राजीनामा दिला असता तर ? तर ६२ चा इतिहास वेगळा घडला असता. काय घडले असते ? ६२ साली भारताची साऱ्या जगतात झालेली अप्रतिष्ठा वाचली असती ? ६२ नंतर देशात माजलेली राजकीय खळबळ झाली नसती ? भारतीय जनतेला झालेले दुःख आणि मनःस्ताप आणि ६२ च्या लढाईमुळे निर्माण झालेली आर्थिक हलाखी टळली असती ? पण आता त्यावर भाष्य करण्यात काय अर्थ आहे ? घडणारे घडून गेले. कदाचित वेगळे काही घडले असते, जर जनरल थिमय्यांनी पुन्हा राजीनामा दिला असता तर !

सेवानिवृत्त झाल्यानंतर जनरल थिमय्यांना सरकारने राज्यपालपद किंवा परदेशांतले भारताचे वकील यांसारख्या महत्त्वाच्या आणि मानाच्या जागा भूषविण्याबद्दल साधी विचारणादेखील केली नाही. आणि लक्षात ठेवा. लष्करी अधिकारी या नात्याने ज्यांचा दर्जा जनरल थिमय्यांपेक्षा फारच खालचा होता अशा अनेक लष्करी अधिकाऱ्यांना ते सेवानिवृत्त झाल्यावर भारत सरकारने राज्यपाल करून टाकून त्यांच्या खुषमस्करीची त्यांना पावती दिली. भारत सरकारच्या हातात प्रखर आणि प्रामाणिक सरकारी नोकरांना काबूत ठेवण्यासाठी हे एक मोठेच जाळे होते. नुसती दोरी ओढायची खोटी की ' मासा ' अडकलाच. भारत सरकार अप्रत्यक्षरीत्या सरकारी नोकरीत असलेल्या बड्या बड्या सरकारी अधिकाऱ्यांना ' सूचना ' देत असे की ' बघ रे बाबा ! तू हल्ली ' राष्ट्रवाद ' वगैरे काहीतरी बोलून सरकारला अडचणीत आणतोस. सरकारी नोकराला हे शोभत नाही. उद्या सेवानिवृत्त झालास तर कुत्राच काय, सरकारदेखील तुला विचारणार नाही. त्यापेक्षा तो अमका तमका सेवानिवृत्त सरकारी अधिकारी बघ ! नोकरीत असेपर्यंत ' वरून ' हुकूम येईल त्याप्रमाणे वागत असे. कधी " असं का ? " " तुमचं काहीतरी चुकतंय ! " असे भलतेच बोलत नसे. कान असून ऐकत नसे आणि ' सरकार ' हा विषय निघाला की चक्क दोन्ही हात तोंडावर दाबून धरून गप्प बसत असे. सरकारी नोकर असावा तर असा. पण त्याचीही सेवा (!) फुकट गेलेली नाही. सेवानिवृत्त झाल्याबरोबर त्याला भारत सरकारने राज्यपाल केला. लठ्ठ पगार, भलीमोठी मोटर, वातानुकूलित बंगला, बंगल्यामध्ये सरकारी खर्चाने भारी किंमतीचे फर्निचर आणि एवढे असून गव्हर्नर म्हणून मागे

पुढे भालदार चोपदार ! काय कमी आहे ?"

... राज्यपाल किंवा परदेशांतला वकील म्हणून काही व्यक्तींच्या नेमणुकी नेहमी होतात पण त्यांपैकी एकाही नेमणुकीबाबत कुठल्या वृत्तपत्राने आवाज उठवल्याचे मी कधी वाचलेले नाही.

... होते ते नेहमी बऱ्याकरताच होते असे आपण म्हणतो. जनरल थिमय्या गव्हर्नर झाले नाहीत (झाले नाहीत याचा अर्थ त्यांना 'केले' नाही असा आहे हे आता वेगळे सांगायला नको.) पण सेवानिवृत्त झाल्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या संरक्षक दलाचे प्रमुख झाले (Chief of the U. N. Force) आणि डिसेंबर १९६५ मध्ये सायप्रस येथे काम करीत असतानाच त्या महान जनरलने वीर मरण पत्करले. त्यांच्यावर जिवंत असताना 'ऐन लढाईतून पळून जाण्याच्या उद्देशाने राजीनामा देणारा जनरल' असा आरोप लादण्यात आला होता तो जनरल थिमय्या लढाईतच मेला. आरोप करणाऱ्या महान व्यक्तीपेक्षादेखील इतिहास मोठा ठरतो तो हा असा !

१९५९ च्या जुलैमध्ये जनरल थिमय्या यांच्या शिफारशी घुडकावून लावून मेजर जनरल बी. एम. कौल यांना 'लेफ्टनंट जनरल' म्हणून बढती देण्यात आली. असे म्हणतात की, या 'बढती' मागे संरक्षणमंत्री कृष्णमेनन यांचाच हात होता. आता लेफ्टनंट जनरल झालेले बी. एम. कौल जुलै १९५९ मध्ये क्वार्टर मास्टर जनरल (Q. M. G.) म्हणून दिल्लीला रवाना झाले. भारतात घडणाऱ्या बारीकसारीक राजकीय आणि लष्करी घडामोडींकडे परदेशांतल्या लोकांचे लक्ष असते. अशाच एका परकीयाने (Welles Hangen) त्याचे या बढतीबाबत असे मत व्यक्त केले की, 'मेननने बी. एम. कौल यांनाच बढती दिली. कारण, मेननच्या मते दिल्लीतल्या बाकीच्या प्रतिगामी जनरल्सच्या मानाने बी. एम. कौल हा फारच पुरोगामी आहे ! कारणे काहीही असोत आता मेनन–कौल युग सुरू झाले होते. धोरणे ठरवायची होती ती मेनन आणि कौल यांनी. ते दोघे दाखवतील ती पूर्वदिशा. भारतीय सेनेतले ऐक्य आणि मिलाफ यांना अशा तऱ्हेने तडा गेला. कारण, हे एक उघड गुपित होते की आर्मी चीफ जनरल थिमय्या आणि जनरल कौल यांच्यांतच वितुष्ट आलेले आहे. तशातच जनरल कौलना संरक्षणमंत्री मेननचा पाठिंबा आणि मेनना पंतप्रधान पंडित नेहरूंचा पाठिंबा. जनरल थिमय्या फक्त नावापुरतेच आर्मी चीफ. भारतीय सैन्यात शिरलेले हे नवीन वारे अनिष्ट होते. वादळ उत्पन्न करणारे होते. सैन्य नेहमी पुढे चालावे असे वाटत असेल तर सैनिकांचा 'एक आवाज' असावा लागतो. आणि युद्ध ऐन तोंडावर आलेले असताना आर्मी चीफ आणि स्टाफ ऑफीसर यांचे हाडवैर निर्माण झालेले.

१९५४ पासून जुलै १९५९ पर्यंत मी आर्मी हेडक्वार्टर्समध्यच नोकरी करीत होतो. जे काय घडत होते ते मी प्रत्यक्ष पाहत होतो. देशाच्या भवितव्यात काय

लिहिलेले आहे याचा मला अंदाज आला होता. जनरल थिमय्या आता पुरते उताराकडे लागलेले आणि एप्रिल १९६१ मध्ये जनरल थिमय्या सेवानिवृत्त झाल्यानंतर, देशाच्या आशाआकांक्षा आणि लष्करी तयारी यांचा संगम करू शकणारा एक तरी जनरल थिमय्या भारतीय सेनेत आहे, ते अजून काहीतरी करू शकतील ही आमची उरली सुरली आशादेखील लुप्त झाली.

मेनन–थिमय्या चकमकीचा अंदाज चिन्यांना होता काय? बहुधा असावा. कारण, जुलै १९५९ मध्ये जनरल बी. एम. कौल यांना बढती मिळालेली आहे. ऑगस्ट ते नोव्हेंबर या काळात हिमालय पर्वतातले वातावरण भारतीय सैन्याला आगेकूच करण्याच्या दृष्टीने प्रतिकूल आहे हे लक्षात घेऊन ऑगस्ट १९५९ मध्येच चिन्यांनी भारताची कुरापत काढण्याच्या दृष्टीने फ्रंटवर असलेल्या चिनी सैनिकांना आदेश दिला की, 'आगे बढो!' आणि चिनी सैन्याची पहिली तुकडी पुढे निघाली, 'लेफ्ट–राईट! लेफ्ट–राईट!' नियती भारताला ओरडून सांगत होती की, 'सावधान!' (क्रमशः)

**By arrangement with THACKER & CO. LTD.**
**from their forthcoming publication,**
**" HIMALAYAN BLUNDER " by Brig. J. P. Dalvi.**
**© with the original publisher.**


# पुरंदऱ्यांची दौलत

**ब. मो. पुरंदरे**

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे २

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ कुबेराच्या संपत्तीवर सेल्स टॅक्स

काही दिवसांपूर्वी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, कायद्याच्या दृष्टीने हिंदू देवता ही ' व्यक्ती ' असल्याने तिच्या उत्पन्नावर कर बसविता येतो. बिचारे हिंदूंचे देव ! निधर्मी राज्यात त्यांच्यावर कोसळलेले हे धर्मसंकट प्रत्यक्ष शेषस्वामी विष्णूचीदेखील झोप उडावी इतके गंभीर आहे. त्यातून विष्णूचा ऐषआराम चालतो तो लक्ष्मीच्या—गजान्त लक्ष्मीच्या—जोरावर. पण तीच लक्ष्मी इन्कमटॅक्सवाल्यांच्या तावडीत सापडली की तिची लंकेची पार्वती व्हायला किती उशीर ? कदाचित तिला वाटेल आपणही हिंदी सिनेमा-नटयांप्रमाणे बाथरूममधल्या गुप्त तिजोरीत मुद्देमाल दडवून ठेवावा. पण अशी तिजोरी प्रत्यक्ष विश्वकर्म्याने स्पेशल ऑर्डरवर करून दिली तरी ती इन्कमटॅक्सवाल्यांच्या त्रासातून, नजरेतून सुटेल की नाही याची दाट शंका आहे.

कुबेराच्या संपत्तीवरही सेल्स टॅक्स बसणार हे ओघानेच आले. आणि इंद्र तर देवांचा राजा. खरे म्हणजे आजकाल युरोपातल्या राजे—राण्या हल्लीच्या महागाईच्या दिवसात आपला तनखा पुरत नाही अशी रास्त तक्रार करीत आहेत व पगारवाढही मागत आहेत, तेव्हा गरीब हिंदुस्थानातल्या देवांचा राजाही असाच चणचणीत असला तर नवल नाही. त्यातून हा इन्कमटॅक्सचा जमालगोटा बसला की बिचाऱ्याला भारतातल्या काही खालसा संस्थानिकांप्रमाणे अमरावतीच्या राजवाड्यात हॉटेल काढावे लागेल. शंकराला मात्र टॅक्सवाल्यांपासून अभय आहे. मात्र स्मगलड शांभवीची भानगड असेल तर शिवशंभूंनी कस्टमवाल्यांपासून जरा सावध असलेले बरे.

## □ चहा आणि उपदेशामृत यांचे मिश्रण

युगोस्लाव्हियातील काही अविवाहित तरुणांनी यूनोकडे मागणी केली आहे की, वर्षातून एक " आंतरराष्ट्रीय ब्रह्मचारी दिवस " साजरा करण्यात यावा. कल्पना कशी आहे हे सांगण्याचे धाडस करीत नाही – कारण आमच्या हिने चुकून हे वाचले तर पंचाईत व्हायची. पण कुठलाही दिवस साजरा करावयाचा म्हणजे भाषण पाहिजेच. तेव्हा ब्रह्मचर्याचे फायदे या विषयावरच्या भाषणांत कोठ कोठले

मुद्दे येऊ शकतील हे पाहिले पाहिजे. अर्थात पहिला फायदा म्हणजे रोजची वेणी अन् दर महिन्याला साडी हा औरंगजेबी जिझिया कर नसतो. दुसरे म्हणजे सक्त-मजुरीच्या शिक्षेचा शॉपिंग नावाचा भयंकर प्रकार सोसावा लागत नाही. महिला वस्तु भांडारवाल्यांच्या नावाने खडे फोडण्यापेक्षा खडी फोडणे निश्चितच अधिक सोपे आहे. तिसरा फायदा म्हणजे "मी कशी दिसते गडे ?" या प्रश्नांचे उत्तर खरे आहे की खोटे हा यक्षप्रश्न पडत नाही. चौथे म्हणजे देव आनंद, दिलीप कुमार इत्यादी मंडळींशी आपली पदोपदी तुलना होत नाही. अन् सर्वांत मोठा फायदा म्हणजे आवडीचे मीठही काही वेळा चांगलेच खारट असू शकते याचा अनु-भव पदरी पडत नाही.

असो. प्रस्तुत ब्रह्मचाऱ्यांनी यूनोकडे दाद मागितली आहे, तेव्हा मानवी हक्कांच्या घोषणेप्रमाणेच ब्रह्मचाऱ्यांच्या हक्कांची घोषणाही तयार करणे यूनोला प्राप्त आहे, अन् अशी घोषणा तयार करण्यास मदत करणे हे माझ्यासारख्या प्रत्येक भूतपूर्व ब्रह्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. मला वाटते, ब्रह्मचाऱ्यांना पहिला हक्क मिळाला पाहिजे तो हवे तेवढे कप चहा पिण्याचा. एके काळी अस्मादिक "ऑल टाइम इज टी टाइम" या टी–बोर्डाच्या आज्ञेचे तंतोतंत पालन करीत होते. अन् आता ? जाऊ द्या... तेहि नो दिवसो गताः... पूर्वी सकाळ–संध्याकाळ चहा व्हायचा त्याच्या-ऐवजी आता सकाळ आणि संध्याकाळ असे दोनच कप मोजून मिळतात. अन् त्यातही चहाच्या प्रत्येक घोटाबरोबर "इतका चहा ढोसणं बरं नाही..." या उपदेशामृताचा घुटका गिळावा लागतो. अर्थात या दोन विसंवादी पेयांची गल्लत झाल्यावर चहाची चव काय राहणार ? ब्रह्मचाऱ्यांच्या आणखी एका जन्मसिद्ध हक्काची पायमल्ली होत असते. तो म्हणजे हवे ते कपडे घालण्याचा हक्क. स्वातं-त्र्याच्या त्या सुवर्णयुगात मी पायजमा घालून अन् पायांत चपला सरकवून सहज-गत्या बाहेर पडत असे. पण आता 'सह'बाहेर पडायचे म्हणजे हिच्या कडक लष्करी 'इन्स्पेक्शन'ला तोंड द्यावे लागते... 'इश्श ! अहो, ही तुमची पँट आहे की पायजमा ? अन् बूट घातल्यावर असे तारेवरची कसरत केल्यासारखे काय चालता ? किती मेला तो गावंढळपणा करायचा ? अन् हे काय, भांग असा चप्प पाडतात ? बाई, बाई, बाई, शर्थ आहे वेंधळेपणाची !" इत्यादी... इत्यादी...

○

# तु म चे भ वि ष्य

# आ म चा अं दा ज

## दि. १२ ते १९ एप्रिलचे राशिभविष्य

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

**मेष :** शनि-मंगळांच्या तीव्र विरोधाला न जुमानता आपण निर्धाराने पुढे पुढे जात आहात यातच आपल्या अपार महात्मतेचे दर्शन घडते.

दि. १३ पासून सूर्याचे तुमच्या राशीत आगमन घडणार असल्यामुळे, अनेक कामांत आशादायक वातावरण सर्वत्र दिसू लागेल. विरोध मावळेल. परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकणार नाही याची खात्री वाटू लागेल. उद्योगधंद्याचे नवे तंत्र याच कालापासून आचरले जाईल, भविष्यकालीन प्रगतीच्या योजना आखल्या जातील, सांपत्तिक विवंचना बऱ्याच प्रमाणात मिटू शकतील.

दि. १३–१४–१८ या कालात आपल्या अपेक्षा बऱ्याच प्रमणात सफल व्हाव्यात.

**वृषभ :** या वेळी एकटा गुरूच तुमच्याशी एकनिष्ठ आहे. तो तुमचा तोल ढळू नये म्हणून सतत प्रयत्नशील राहील

विरोधकांचा त्रास तीव्र स्वरूप धारण करील. अस्वास्थ्य, मतभेद, कौटुंबिक संघर्ष, अनारोग्य या साऱ्या गोष्टींचा थोडाफार परिणाम मधून मधून जाणवेल. असे असूनही तुमच्या प्रतिष्ठेला धक्का लागेल असे चुकूनही घडणार नाही.

व्ययस्थ सूर्यामुळे, आणखीन परिस्थिती चिघळेल की काय असे वाटू लागेल. विरोधकांचे आव्हान स्वीकारण्याच्या भानगडीत मुळीच पडू नका. प्रत्येक गोष्टीत जुळते मिळते घेण्यावाचून गत्यंतर नाही.

दि. १४ ते १६ एवढेच दिवस थोडेफार अनुकूल.

**मिथुन :** सूर्य एक विशाल तेजोगोल एकादशांत आणि शनि-बुधही त्याच्या बरोबर. कित्येक दिवसानंतर अशी अनुकूल ग्रहस्थिती तुमच्या वाट्यास येत आहे. या ग्रहस्थितीचा अधिकाधिक लाभ उठवलात तर तुमचे बरेचसे प्रश्न या काली सुटू शकतील.

अनपेक्षित लाभाची शक्यता आहे, नोकरीधंद्याचे स्वरूप अधिक आकर्षक दिसू लागेल, इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य लाभेल. नव्या व्यवसायधंद्याचे विचार कृतीत उतरण्याची शक्यता वाटू लागेल.

मंगळ षष्ठात असल्यामुळे विरोधकांना ठोकरून काढणे आता सहसा अवघड वाटणार नाही.

दि. १६ ते १८ या काली अनेक अपेक्षित लाभ पदरी पडावेत.

**कर्क** : दशमातील सूर्यामुळे, तुमच्या साऱ्या योजना आता आकार घेऊ लागतील. भाग्यस्थ शुक्राचे सहकार्यही आपणास हरघडी मिळू लागेल. कला-साहित्याच्या प्रांतात मुक्तसंचार होऊ लागेल. आणि त्यातील प्रतिष्ठेचे स्थानही मिळू शकेल.

या काली आपण कोणतेही काम हाती घेतलेत तर त्यात अपेक्षेबाहेर यश मिळवू शकाल.

चित्रपट व्यवसायातील व्यक्तींना तर या कालाइतका सर्वांगाने अनुकूल काल यापूर्वी क्वचितच जाणवला असेल. सामाजिक प्रतिष्ठा खूपच उंचावेल, दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. मंगलकार्याचे जवळ जवळ निश्चित ठरेल.

दि. १६ पासून आपली पावले वेगाने प्रगतीकडे पडू लागतील.

**सिंह** : सूर्य–बुध भाग्यस्थानी येताच तुमचे कालचक्र अनुकूल फिरू लागेल. चौथ्या मंगळाची उग्रता बरीचशी कमी होऊ लागेल. रेंगाळलेल्या कामांना गती मिळू लागेल. या आठवड्यात दूरच्या प्रवासाच्या योजना आखल्या जातील. अनेक व्यथा-विवंचना मिटू लागतील. राहत्या जागेच्या, स्थावराच्या अडचणी बऱ्याच प्रमाणात दूर होतील.

धनस्थ गुरूचे सामर्थ्य येथूनच आपल्या प्रत्ययास यावे. अनपेक्षित स्वरूपाचे धनलाभ होणे शक्य आहे.

यांत्रिक–विद्युत क्षेत्रांतील व्यक्तींना तर हा एक सर्वोत्तम प्रगतीचा काल अनुभवण्यास मिळेल.

दि. १६ ते १८ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कन्या** : मंगळ पराक्रमात असल्याने कन्या राशी व्यक्तीच सध्या सर्वच क्षेत्रात आघाडीवर दिसतील. सामाजिक–सांस्कृतिक कार्यक्रमात हिरीरीने भाग घेऊन ते यशस्वी करून दाखवाल. नोकरीधंद्यात तर अपेक्षेबाहेर यश पदरी पडेल.

उद्योगधंद्याचे नवे क्षेत्र हस्तगत होईल. स्थावराच्या प्रयत्नांत यश लाभेल, वाहनाची विवंचना मिटेल. वरचेवर प्रवास घडेल. बदली, बढतीचे योग कोणत्याही क्षणी दिसू लागतील.

सांपत्तिक दृष्टीनेही या कालाचे महत्त्व मोठे जाणवेल. यंत्र, रसायने, वैद्यकीय व्यवसायात फार मोठे यश लाभेल.

दि. १५ ते १७ अनुकूल काल.

**तूळ :** सध्या ग्रहाची म्हणावी तशी सहानुभूती मिळत नसूनही तुमची प्रगतीची घोडदौड चालूच राहील. आजवर आपणांस दैवीपेक्षा कर्तृत्वाचाच कौल अनेक वेळा लाभलेला आहे.

या कालीही अनेक गोष्टी अपेक्षेप्रमाणे यशस्वी ठरतील. पण भागीदारीचा व्यवहार शक्यतो टाळा. व्यवहार क्षेत्रात विरोध, संघर्ष निर्माण होऊ नये म्हणून सतत दक्ष राहा.

राजकीय–सामाजिक जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणावर उचलू नका. वाहनांसाठी, स्थावरासाठी बराचसा खर्च वाढेल. या महिन्याचे तुमचे अंदाजपत्रक साफ चुकेल. अनाहूतपणे निर्माण होणाऱ्या खर्चाला सतत तोंड द्यावे लागेल.

दि. १२ ते १४ हा काल बराच घाईगर्दीचा जाणवेल.

**वृश्चिक :** मंगळाचा ताण आणि गुरूची सहानुभूती असा द्विधा मन:स्थितीचा अनुभव तुम्हांला घ्यावा लागत आहे. यश नेत्रदीपक, पण परिश्रम खूपच, असे हे सध्याचे चमत्कारिक दिवस आहेत. मुख्यत: या वेळी जपा प्रकृतीला. पित्तांश वाढेल, मन त्रस्त व संतप्त बनेल, क्षुल्लकशा गोष्टींवरूनही वितंडवाद वाढू लागेल.

राजकीय क्षेत्रात अनेक प्रकरणे हातघाईवर येतील. सामाजिक क्षेत्रात तीव्र विरोध मोडून पुढे वाटचाल करावी लागेल. पैसा तर पाण्यासारखा खर्च होईल, पण फारसे बिघडणार नाही.

दि. १४ ते १७ अनुकूल काल.

**धनू :** व्ययस्थ मंगळाची डोकेदुखी पूर्वीप्रमाणे सुरूच आहे. सांपत्तिक ताण असह्य वाटू लागेल, विरोधक उठाव घेऊ लागतील. हाती घेतलेली कामे गतिशून्य बनू लागतील आणि त्यामुळे मन अस्वस्थ आणि उदास बनेल.

या कालात जबाबदारीचे ओझे न उचलणेच शहाणपणाचे ठरेल. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी थोरांचे मार्गदर्शन अत्यावश्यक ठरेल.

या काली सावधानतेची नितांत गरज भासेल. महत्त्वाच्या वस्तू हरवतील. अनवधानपणा अंगाशी येईल, अगदी भरंवशाची माणसेही ऐन वेळी बेभरंवशी ठरतील. हाती घेतलेल्या बऱ्याचशा योजना पैशाअभावी बारगळतील.

दि. १३ ते १५ थोडेफार अनुकूल दिवस.

**मकर :** गुरु-मंगळांचे प्रचंड सामर्थ्य आपल्या पाठीशी असल्यामुळे चौथ्या रवि-शनीचा आपणांवर फारसा परिणाम होणार नाही. निर्धास्थ राहा. निर्धारनिष्ठेचे भांडवल तुमच्याकडे इतके मोठे आहे की, कुणीही तुमचा तेजोभंग करू शकणार नाही.

व्यवसायधंद्यात प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. अनपेक्षितपणे

धनलाभ होण्याची शक्यता कोणत्याही क्षणी आहे. नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील. तुमच्या नव्या योजना लवकरच यशस्वी ठरू लागतील.

दि. १४ ते १७ विशेष अनुकूल काल.

**कुंभ :** आजवर अनेक ग्रहांचे आपणांस साहाय्य लाभले. आता या आठवड्या-पासून सूर्यही तुमच्या पराक्रमस्थानी येत असल्यामुळे तुमचे वातावरण अधिकच सुधारेल. प्रवास, बदल, स्थानांतर अशा गोष्टी कोणत्याही क्षणी घडाव्यात. सांपत्तिक लाभालाही हा काल अत्युत्तम प्रगतीचा जाणवेल.

कला-साहित्य-संशोधन या क्षेत्रांत तर तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल. तुमच्यातील सुप्त कर्तृत्वाला आवाहन करणारी ग्रहस्थिती निर्माण होत आहे. तिचा अधिकाधिक लाभ पदरी पाडून घ्या.

दि. १३ ते १७ अधिक यशदायी काल.

**मीन :** गुरु-मंगळांचे हार्दिक सहकार्य ज्यांना लाभले, त्यांना कोणत्याच गोष्टीत चुकूनही माघार घेण्याचा प्रसंग सहसा येणार नाही.

हरवलेले स्वास्थ्य गवसेल, रेंगाळलेल्या कामांना गती मिळू लागेल, नोकरीधंद्यां-तील पेचप्रसंग सुटायला लागतील.

चित्रकला, नाटच, साहित्य या क्षेत्रांतील व्यक्तींना मीनेच्या शुक्रामुळे अपेक्षे-बाहेर यश लाभेल. पैसा मिळेल, पैशापक्षा लाखपटींनी प्रतिष्ठा लाभेल.

आपल्या विवंचना बऱ्याच प्रमाणांत मिटू लागतील.

दि. १४ ते १६ अनेक कार्यांत घवघवीत यश लाभेल.

## मुंबई समाचार


[ पृष्ठ ७ वरून

चार-पाच तरुणांच्या चर्चेत पुढे आलेला तो विचार असा—' लॉटरीद्वारे महाराष्ट्र शासनाला दरमहा जवळ जवळ दीड कोटींचा फायदा होणार आहे. ह्यांपैकी काही रक्कम—निदान एक चतुर्थांश तरी—अशा तरुणांना नाममात्र कर्जाने वाटली जावी की, ज्यांच्याजवळ योजना आहेत, कल्पना आहेत, आवश्यक ते तांत्रिक ज्ञान आहे, परंतु भांडवल नाही व ह्या योजनेचा लाभ शक्यतो महाराष्ट्रीयन तरुणांना, की जे अद्याप व्यवसायात शिरलेले नाहीत—मिळावा. त्याचप्रमाणे छोटे छोटे उद्योगधंदेही पुष्कळदा भांडवलापायी मोडकळीस आलेले आढळतात. त्यांचीही पाहणी करून, त्यांना ह्या लॉटरी-निधीतून उचल करू द्यावी...तद्वतच अडीच व एक लाखाची बक्षिसे ज्यांना मिळतील त्यांनी आपल्या बक्षिसाची निदान निम्मी रक्कम तरी उद्योगधंद्यांत—शक्यतो छोट्या—गुंतवावी, असेही बंधन असावे.'

○


अशी सुरेख बारा चित्रें घ्या
क्लिक III खरेदी कराल त्याच दिवशी
• फक्त रोखा नि करा क्लिक. लावायला नको. चूक होण्याची धास्ती नाहीं.
• '१२०'च्या रोलवर १२ मोठी (६×६ सें.मी.) छायाचित्रे.
• तोबिस्कर आच्छादन, पोर्ट्रेट लेन्स व फ्लॅशगन पाहिजे असल्यास जादा आकार.
आगफा यांच्या देखरेखीखाली दि न्यु इन्डिया इन्डस्ट्रीज लि. बडोदे, यांनी तयार केला
प्रमुख विक्रेते:
आगफा-गेव्हार्ट इंडिया लिमिटेड
मुंबई नवी दिल्ली कलकत्ता मद्रास

MANOOS (Weekly) । 40 Paise । Regd. No. M H-649




# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

किंमत । रुपये पंचवीस

राजहंस प्रकाशन


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी संगम प्रेस, प्रा. लि., १७-ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**